MHRG020010192020

दाखल तारीख – २०/०७/२०२०
नोंदणी तारीख – २०/०७/२०२०
निकाल तारीख –१४/०७/२०२६
कालावधी – **०५ व., ११ म. २५ दि.**

**दुसरे सह दिवाणी न्यायाधीश (वरीष्ठ स्तर) यांचे न्यायालय,**

**अलिबाग, जि. रायगड.**

**(पीठासीन अधिकारी श्री. एस.एन.नाईक)**

**नियमित दिवाणी दावा क्र.६४/२०२०** **निशाणी क्र.११९/अ.**

०१. **श्री.गंगाराम कमळाजी उर्फे कमळाकर पाटील,**
वय : ७३ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त/शेती,
राहणार : ए–३०७, वास्तुशांती बिल्डींग, प्लॉट नं.१३, सेक्टर नं.११, कळंबोली,
तालुकाः पनवेल, जिः रायगड. **वादी..**

**–:विरूध्दः–**

०१. **श्री. जानू उर्फे जनार्दन कमळाकर पाटील,**
वय : ६४ वर्षे, धंदा : रिक्षा चालक,
रा. :आल.आय.जी.–के ५८, सेक्टर ३ ई,
कळंबोली, तालुकाः पनवेल, जिः रायगड.
गावचा पत्ता, मु. तळवली, पो. रामराज,
ता. अलिबाग, जि. रायगड.

०२. **श्री. बाळाराम कमळाकर पाटील,**
वय : ५३ वर्षे, धंदा : रिक्षा चालक,
राहणार : खेडुकपाडा, नरेश लहु उलवेकर चाळ, किनारा देशी बार पाठीमागे,
तालुकाः पनवेल, जि. रायगड.
गावचा पत्ता. मु. तळवली, पो. रामराज,
तालुकाः अलिबाग, जिः रायगड.

०३. **शिवराम कमळाकर पाटील (मयत) वारस.**

**३–१ श्रीमती. संजिवनी शिवराम पाटील,**
वयः ५७ वर्ष, धंदा– गृहिणी.

**३–२ श्री. प्रणित शिवराम पाटील,**
वयः २४ वर्षं, धंदा– नोकरी.

**३–३ श्रीमती. भावना गणेश शिंदे,**
वयः ३३ वर्षं, धंदा– गृहिणी,
रा. केशव कुंज, प्लॉट नं. ९१,
रुम नं, ४०१, नावडे कॉलनी,
ता. पनवेल, जि.रायगड.

**३–४ श्रीमती. भाग्यश्री जयवंत खारकर,**
वयः ३१ वर्षं, धंदा– गृहिणी,
रा. हिरा निवास,
रुम नं, ३०५, सेक्टर ५,
प्लॉट नं.१५०, घनसोली.

**३–५ श्रीमती. प्रिया रुपेश गांवड,**
वयः २८ वर्षं, धंदा– गृहिणी,
रा. अ.क्र.१, २ व ५,
रा. रोज कॉर्नर, नावडे, फेज–०२,
ता. पनवेल, जि.रायगड.

**०४ श्रीमती. देवूबाई जानू भुरे,**
वयः ६७ वर्षं, धंदा– गृहिणी,
रा.तळवली, पो, रामराज.

**०५. श्रीमती. वंदना हरिश्चंद्र तेलगे,**
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी,
राहणार : भागवाडी, पो. रामराज,
तालुकाः अलिबाग, जिः रायगड.

**०६. श्रीमती. आशा मोहन सर्णेकर,**
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी,
राहणार : ढोनखार, पो. दापोली,
तालुकाः अलिबाग, जिः रायगड **प्रतिवादी..**

**–:प्रतिनिधित्वः–**

वादी करीता विद्वान विधिज्ञ :– श्रीमती. रेश्मा जी. पाटील.
प्रतिवादी करीता विद्वान विधिज्ञ :– श्री. व्ही. डी. कळके.

# न्या य नि र्ण य
## (पारित दिनांकः–१४/०७/२०२६)

वादमालमत्तेमध्ये वादीचा अविभक्त हिस्सा असल्याचे घोषित करुन वादीचा हिस्सा तुटक व पृथक करुन त्याच्या स्वतंत्र ताब्यात देवविण्यात यावा. तसेच, प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी मांडलेला मृत्युपत्राचा लेख क्र.२४९८/२००७, बनावट, अवैध, निरर्थक आणि बेकायदेशीर असल्याने वादीच्या हिस्सा व अधिकारावर बंधनकारक नाही, असे घोषित करण्यात यावे. याशिवाय, प्रतिवादींना वादमालमत्ता हस्तांतरीत करण्यास प्रतिबंध करणारी निरंतर ताकीद देवविण्यात यावी. येणेप्रमाणे, वादीने मागीतलेले सर्व दिलासे प्रस्तुत दाव्यात विचाराधीन आहेत.

**वादविषय असलेल्या मिळकतींः–**

**०२.** मौजे तळवली तर्फे उमटे, ता. अलिबाग, जि.रायगड, येथील प्रस्तुत दाव्याचा वादविषय असलेल्या मिळकती पुढील प्रमाणे आहेतः–

| अ.क्र. | जुना सर्वे नंबर | नवीन गट क्रमांक | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| ०१ | १४/१ ते ११/१ | ११६ | ०.४४.७० हे.आर. |
| ०२. | ८६/१/ब | ४९६ | ०.३७.४० हे.आर. |
| ०३. | ७/४/क | ७५ | ०.४.० हे.आर. |
| ०४ | ७/१२/ब | ८१ | ०.१९.२० हे.आर. |
| ०५. | १०/१/क | १२० | ०.२५.० हे. आर. |
| ०६. | ९/३ | ९४ | ०.०३.७० हे.आर. |

**आणि**

मौजे तळवली तर्फे उमटे येथील **ग्रामपंचायत घर क्र.१७५,** ज्याच्या चतुःसिमा पुढील प्रमाणे आहेतः–

**पुर्वेस** :– श्री. जगन्नाथ रामभाऊ पाटील यांचे घर
**पश्चिमेस** :– श्रीमती. गंगुबाई महादेव माळी यांचे घर
**दक्षिणेस** :– श्री. दत्तात्रेय नारायण पाटील यांचे घर
**उत्तरेस** :– दिवंगत सखुबाई पाटील यांचे घर.

उपरोक्त उल्लेखित शेतजमिनीं आणि घर मिळकत प्रस्तुत दाव्याचा वादविषय असलेल्या मालमत्ता आहेत. यापुढे, न्यायनिर्णयामध्ये

सर्वच दावामालमत्तेचा उल्लेख एकत्रितपणे '**वादमालमत्ता**' असा करण्यात येत आहे.

## वादपत्रातील कथनाप्रमाणे दाव्याची पार्श्वभुमी संक्षेपानेः–

**०३.** वादीचे कथन असे आहे की, प्रतिवादीं क्र.०१ ते ०३ त्यांचे सख्खे भाऊ असुन प्रतिवादी क्र.०४ ते ०६ त्याच्या सख्ख्या बहिणीं आहेत. कमळ्या उर्फ कमळ्या राघो पाटील आणि धाकलीबाई कमळ्या उर्फ कमळाकर पाटील यांची वादी व प्रतिवादी मुलं मुली आहेत. वादी व प्रतिवादी यांच्या कुटूंबाचे मुळपुरुष राघो गणु पाटील होते. त्यांना गोंविद राघो पाटील, नारायण राघो पाटील आणि कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील, असे तीन पुत्र होते. येणेप्रमाणे, वादी व प्रतिवादी यांचा रक्तनातेसंबंध व वंशावळ आहेत.

**०४.** वादीचे पुढे असे कथन आहे की, उपरोक्त उल्लेखित वादमालमत्ता कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या वडीलोपार्जित मिळकतीं आहेत. राघो गणु पाटील यांच्या मृत्युपश्चात त्यांचे पुत्र गोंविद राघो पाटील, नारायण राघो पाटील आणि कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांची नावे फेरफार क्र.८८२ व १२३८ अन्वये सातबाराला नोंदविण्यात आली आहेत. गोंविद राघो पाटील, नारायण राघो पाटील आणि कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील या तिघां भावांमध्ये वडीलोपार्जीत मिळकतींचे वाटप झाले. सदर वाटपामध्ये उपरोक्त उल्लेखित वादमालमत्तां फेरफार क्र.१२३८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या हिस्सा, मालकी व ताबा वहिवाटीस आल्या आहेत. सदर मालमत्ता वादी व प्रतिवादीं यांच्या हिंदु एकत्र कुटूंबाच्या, संयुक्त मालकीच्या अविभक्त मालमत्ता आहेत. वादीं व प्रतिवादीं वाद मिळकतीचे सहहिस्सेदार असुन, त्यांचा मालमत्तेमध्ये समसमान अविभक्त हिस्सा आहे. आजपर्यंत, वाद मालमत्तेचे वादीं व प्रतिवादीं यांच्यात सरसनिरस वाटप झालेले नाही.

**०५.** वादींचे पुढे असे कथन आहे की, मौजे तळवली तर्फे उमटे येथील ग्रामपंचातय घर क्र.१७५ या घराचे बांधकाम वादी घरातील मोठा मुलगा असल्याने, त्यांने स्वतःच्या खर्चाने केलेले आहे. असे असतांना, प्रतिवादी क्र.०१ यांने वादीची फसवणुक करुन, सदरचे घर ग्रामपंचायत अभिलेखामध्ये स्वतःच्या नावाने नोंदवून घेतले आहे. तसेच मौजे तळवली येथील गट क्र.११६ व ४९६ या मिळकतीं देखील प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी स्वतःच्या नावे नोंदवून घेतल्या आहेत.

०६. वादींचे पुढे असे कथन आहे की, त्यासंदर्भात वादींने चौकशी केली असता, वादीला असे समजले की, कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या वृध्दावस्थेचा, मानसिक व शारिरीक दुर्बलतेचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र.०१ जानु उर्फ जनार्दन पाटील आणि प्रतिवादी क्र.०२ बाळाराम कमळाकर पाटील यांनी सगंन्मत करुन कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या नावाने दिनांक १६/०५/२००७ रोजी मृत्युपत्राचा लेख नोंदणी क्र.२४९८/२००७ गैरकायदेशीरपणे, अनाधिकाराने, बनावट व खोटा निष्पादित करुन घेतला. वास्तविक पाहता त्यावेळी कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांची शारिरीक स्थिती खालावलेली होती. त्याला निट ऐकू येत नव्हते, हिडंता फिरता येत नव्हते. तो नेहमी आजारी असायचा. त्यामुळे, मृत्युपत्राचा लेख निष्पादित करण्याकरीता, कोठेही जाण्याची कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांची स्थिती नव्हती. प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या जागी तोतया ईसम उभा करुन बनावट, खोटे, अवैध असा मृत्युपत्राचा लेख निष्पादित करुन घेतला आहे. सदरचा मृत्युपत्राचा लेख कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांनी करुन दिलेला नाही. सबब, सदर मृत्युपत्राचा लेख गैरकायदेशीर, खोटा, बनावट व निर्थंक असल्यामुळे तो वादीच्या हक्क व अधिकारांवर बंधनकारक नाही. वादमालमत्ता एकत्र हिंदु कुटूंबाच्या सामाईक मालकीच्या आहेत. प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या लाभात मृत्युपत्राचा लेख निष्पादित करण्याचा कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांना कोणताही हक्क व अधिकार नव्हता. प्रत्यक्षात सदर मृत्युपत्राचा लेख कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांनी करुन दिलेला नाही. त्यामुळेच, त्यासंदर्भात प्रतिवादींनी वादीला अंधारात ठेवले. वादीला कोणतीही माहिती किंवा पुर्वसुचना न देता, तथाकथित बनावट व खोटया मृत्युपत्राच्या लेखाआधारे प्रतिवादींनी त्यांची नावे महसुल अभिलेखात परस्पर नोंदवून घेतली. वास्तविक पाहता कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील मयत झाल्यानंतर महसुल अधिकारी यांनी त्याच्या सर्व वारसांची नावे वादमालमत्तेच्या सातबारा पत्रकात नोंदविणे आवश्यक होते. परंतु, प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी महसुल अधिका–यांना हाताशी धरुन बनावट, खोटया व गैरकायदेशीर मृत्युपत्राच्या लेखाआधारे त्यांची नावे दावामिळकतींच्या सातबाराला नोंदवून घेतली.

**०७.** वादींचे पुढे असे कथन आहे की, तथाकथित बनावट व खोटया मृत्युपत्राच्या लेखाआधारे प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी सातबारा पत्रकात त्यांची नावे नोंदविण्यात आल्यानंतर वादीचा वादमालमत्तेतील हिस्सा व अधिकार नाकारला आहे. त्यामुळे, नाईलाजास्तव दिनांक ०४/०३/२०२० रोजी वादीने प्रतिवादींना विधिज्ञांमार्फत नोटीस पाठवुन वादमालमत्तेतील त्यांचा हिस्सा तुटक व पृथक करुन स्वतंत्र ताब्यात देण्याची मागणी केली. सदर नोटीसीला प्रतिवादीं क्र.०१ व ०२ यांनी नोंटीस पाठवुन वादीचा वादमालमत्तेतील हिस्सा व अधिकार नाकारला आहे. वाद मालमत्ता एकत्र कुटूंबाच्या मालकीच्या मिळकती असल्यामुळे, वादीचा सदर मिळकतींमध्ये अविभक्त हिस्सा आहे. बनावट व खोटया मृत्युपत्राच्या लेखाआधारे प्रतिवादींनी वादमालमत्ता त्रयस्थ व्यक्तींना हस्तांतरीत, विक्री केल्यास किंवा त्रयस्थ ईसमांचे हक्क किंवा हितसंबंध त्यांत निर्माण केल्यास, वादीचे कधीही भरुन न येणारे असे, अपरिमित नुकसान होण्याचा संभव आहे. सदर प्रस्तुत दावा दाखल करण्यास कारण उद्भवले, असे वादीचे कथन आहे. उपरोक्त सर्व तथ्यांचा व परिस्थीतींचा विचार करता, दावा खर्चासह डिक्री करण्यात यावा आणि वादपत्राद्वारे मागितलेला अनुतोष देवविण्यात यावा, अशी वादीची विनंती आहे.

## <u>प्रतिवादींची लेखी कैफियतः–</u>

**०८.** प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी त्यांची लेखी कैफियत निशाणी क्र.२९ ला पटलावर दाखल केली आहे. प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादपत्रातील कथन बनावट, लबाडीचे, पुर्णपणे खोटे व खोडसाळ आहेत, त्यामुळे, प्रतिवादींना ते मान्य नाही. प्रस्तुत दावा दाखल करण्याचा वादींना कोणताही हक्क व अधिकार नाही. प्रस्तुत दाव्यास प्रतिष्टंभ (Estoppel) व संमती (Acquiescence) या तत्वाची बांधा निर्माण होते. त्याचप्रमाणे, दाव्यास मुदतीच्या कायदयाची बांधा निर्माण होते. यासर्व, कारणांकरीता, कायदेशीर मुद्यांवर दावा फेटाळण्यास पात्र आहे.

**०९.** प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, गोविंद राघो पाटील, नारायण राघो पाटील आणि कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यां तिघांनी सन १९४५ च्या सुमारास त्यांच्या वडीलांच्या मिळकतींचे आपसात वाटप करुन घेतले. सदर वाटपामध्ये दावामिळकतीं कमळया उर्फ कमळाकर राघो

पाटील यांच्या हिस्यास देण्यात आल्या. त्यासंदर्भात, फेरफार क्र.१२३८ नोंदविण्यात आलेला आहे. दावामिळकतीं वाटपाने कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या मालकी व ताबे वहिवाटीस आलेल्या आहेत. त्यामुळे, दावामिळकतीं त्यांच्या स्वसंपादित मिळकतीं झालेल्या आहेत. सदर मिळकतींमध्ये वादीचा कोणताही हक्क व अधिकार नाही. सदर मिळकतींसंबंधाने दावा दाखल करण्याचा आणि वाटप मागण्याचा वादीला कोणताही हक्क व अधिकार नाही. वादीचा दावा कायदेशीर नसल्याने, तो फेटाळण्यास पात्र आहे.

**१०.** प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, दावामिळकतीं वाटपाने कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या हिस्यास आल्या असल्याने, त्या त्यांच्या स्वअर्जित, स्वतंत्र मालकीच्या मिळकतीं होत्या. सदर मिळकतींची विक्री, बक्षीस, मृत्युपत्र किंवा अन्य प्रकारे विल्हेवाट लावण्याचा, त्यांना पुर्ण अधिकार होता. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांनी लिहुन ठेवलेला मृत्युपत्राचा लेख नोंदणी क्र.२४९८/२००७, दिनांक १६/०५/२००७ कायदेशीर असुन तो वादी व प्रतिवादींवर बंधनकारक आहे. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील दिनांक २१/०१/२०१९ रोजी मयत झाला आहे. त्यानंतर, दिनांक ०२/१२/२०१९ रोजी फेरफार क्र.४१३ अन्वये सदर मृत्युपत्राच्याआधारे प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांची नावे दावामिळकतींच्या महसुल अभिलेखात मालक व ताबेदार म्हणुन नोंदविण्यात आलेली आहेत. सदर मृत्युपत्राच्याआधारे प्रतिवादी क्र.०१ व ०२ हे गट क्र.११६ व १९६ या शेतजमिनींचे आणि घर क्र.१७५ या मिळकतीचे मालक झालेले आहेत.

**११.** प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, वादी हा कुटूंबातील मोठा मुलगा आहे. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील आणि धाकलीबाई कमळाकर पाटील, यांचे पालनपोषण, उदरनिर्वाह व औषधपाण्याची कोणतीही जबाबदारी वादीने कधीही पार पाडली नाही. धाकलीबाई कमळाकर पाटील, त्यांच्या मृत्युपुर्वी तीन वर्षं अगोदरपासुन आजारी होत्या. त्या अंथरुणास खिळुन होत्या. त्यांना अर्धांगवायुचा आजार झालेला होता. त्या रुग्णालयात दाखल होत्या. त्या कालावधीत देखील, वादीने त्यांची कोणतीही देखभाल, सेवासुश्रुषा किंवा औषधोपचार कधीही केलेला नाही. धाकलीबाई कमळाकर पाटील, दिनांक २२/०१/२००६ रोजी मयत झाल्या. त्यांच्या मृत्युनंतर, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांची सुध्दा वादीने कधीही देखभाल

किंवा सेवासुश्रुषा केली नाही. त्यामुळे, कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांने वादीला त्याच्या मिळकतीमध्ये हिस्सा व अधिकार नाकारला. त्यावर चिडुन जावून वादीने त्यांना मारहाण केली. त्यावेळी, गावातील लोकांनी वादीची समजुत काढली.

**१२.** प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, वादीने वारंवार वाटपाची मागणी केल्यामुळे, कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांनी मिळकत वादीला वाटुन देण्याची ईच्छा व्यक्त केली. त्यावेळी, मौजे तळवली उर्फे उमटे येथील गट क्र.१२० ही मिळकत त्यातील गुरांचा बेडा व बेडयात असलेले रुपये दोन लक्ष किंमतीची सागाची लाकडे वादीने त्याच्या हिस्यास मागितले. त्याप्रमाणे, कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांनी गट क्र.१२० क्षेत्रफळ २५ गुंठे त्यातील गुरांचा बेडा व बेडयातील रुपये दोन लक्ष किंमतीची लाकडे वादीच्या हिस्यास दिले. त्याचवेळी, कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांनी गट क्र.११६ व गट क्र.४९६ यामिळकती जनार्दन (प्रतिवादी क्र.०१) व बाळाराम (प्रतिवादी क्र०२) यांना आणि, गट क्र.७५, ८१ व ९४ यामिळकतीं शिवराम (प्रतिवादी क्र.०३) यांना वाटपाने दिल्या. कमळया उर्फे कमळाकर राघो पाटील यांने त्याच्या हयातीतच त्यांच्या मिळकतींचे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दिनांक १०/०४/२००७ रोजी वाटप करुन दिले आहे. त्यानुसार, ज्याच्या त्याच्या हिस्यास आलेली मिळकत ज्याच्या त्याच्या ताबा व कब्जेवहिवाटीत आहे. त्यामुळे, वादमालमत्तेचे वाटप करुन मागण्याचा वादीला कोणताही हक्क व अधिकार नाही.

**१३.** प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, वादीच्या सांगण्यानुसार कमळया उर्फे कमळाकर राघो पाटील यांनी घर क्र.१७५, प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांच्या हिस्यास दिलेली आहे. त्यानंतर, प्रतिवादींनी आपसामध्ये ठरवून घर क्र.१७५ एकटया प्रतिवादी क्र.०१ जानु उर्फ जनार्दन कमळाकर पाटील याला दिले. त्याबदल्यात, प्रतिवादी क्र.०१ जानु उर्फ जनार्दन कमळाकर पाटील, यांने प्रतिवादी क्र.०२, बाळाराम व प्रतिवादी क्र.०३ शिवराम यांना प्रत्येकी रुपये बावीस हजार दिले आहेत. वादीने सांगितल्याप्रमाणेच कमळया उर्फे कमळाकर राघो पाटील यांनी त्याच्या मिळकतीचे वाटप करुन दिलेले आहे. त्यामुळे, सदर वाटपासंबंधाने आता आक्षेप नोंदविण्याचा आणि परत वाटप मागण्याचा वादीला हक्क व अधिकार पोहचत नाही.

**१४.** प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, मागील चाळीस वर्षांपासुन वादी हा त्याच्या सासरी मौजे भागवाडी येथे घर बांधुन तेथे वास्तव्यास आहे. तो कधीही तळवळी तर्फे उमटे या गावी येत नाही. त्यांने गावाचा संबंध सोडून दिलेला आहे. वादीने त्याच्या आईवडीलांची म्हणजेच कमळया उर्फे कमळाकर राघो पाटील आणि धाकलीबाई कमळयाकर पाटील यांचे कधीही पालनपोषण, उदरनिर्वाह, औषधपाणी, कपडालत्ता यांची सोय केलेली नाही. त्यांची कधीही सेवासुश्रुषा केलेली नाही. त्यांच्या मृत्युनंतर त्यांच्या अंतिमविधीचा व इतर खर्च देखील वादीने कधीही केलेला नाही. प्रतिवादींनी कमळया उर्फे कमळाकर राघो पाटील आणि धाकलीबाई कमळाकर पाटील यांचा सांभाळ, पालनपोषण, उदरनिर्वाह, औषधपाणी, कपडालत्ता, सेवासुश्रुषा, त्यांच्या अंतिमविधीचा व इतर खर्च केवळ प्रतिवादींनीच केला. कमळीबाई कमळाकर पाटील हिच्या आजारपणाचा व औषधोपचाराचा खर्च रुपये दोन लक्ष पन्नास हजार प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनीच केला. त्याचप्रमाणे, कमळया उर्फे कमळाकर राघो पाटील याच्या औषधोपचाराचा इतर खर्च रक्कम रुपये दोन लक्ष प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनीच केला आहे.

**१५.** प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, कमळया उर्फे कमळाकर राघो पाटील यांच्या हयातीतच वादी त्यांना व इतर प्रतिवादींना त्रास देत असल्यामुळे, कमळया उर्फे कमळाकर राघो पाटील यांनी भविष्यामध्ये वादीने तो पोलीस खात्यात नोकरीला असल्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादींना त्यांने त्रास देवू नये, याकरीता, दिनांक १६/०५/२००७ रोजी त्यांच्या स्वसंपादित व स्वतंत्र मालकीच्या गट क्र.११६ व ४९६ या मिळकतींचे मृत्युपत्र लिहुन ठेवले आहे. त्या मृत्युपत्रानेदेखील गट क्र.११६ व ४९६ या मिळकतीं प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांना दिलेल्या आहेत. येणेप्रमाणे, प्रतिवादी त्यांच्या वाटयास व हिस्यास आलेल्या मिळकतींचे वाटपाने आणि मृत्युपत्राने मालक व ताबेदार झाले आहेत. तरी देखील, वादीची ईच्छा असल्यास जमिन गट क्र.१२० हिचे वाटप करण्यास प्रतिवादींची हरकत नाही. परंतु, दाव्यातील इतर मिळकतींचे वाटप करण्यास प्रतिवादींचा आक्षेप आहे. कारण त्या मिळकतींचे पुर्वीच वाटप झालेले आहे आणि वाटपानुसार जो तो ज्याच्या त्याच्या हिस्यास आलेल्या मिळकतीचा मालकी हक्काने उपभोग घेत आहे. सबब, उपरोक्त सर्व तथ्यांचा व परिस्थीतींचा विचार करता दावा खर्चासह

फेटाळण्यात यावा, अशी प्रतिवादींची विनंती आहे. तसेच, वादीने प्रस्तुतचा दावा दाखल करुन प्रतिवादींना नाहक खर्चास सामोरे जाण्यास भाग पाडले असल्यामुळे, प्रतिवादींना वादीकडुन नुकसान भरपाई रुपये एक लक्ष देवविण्यात यावी, अशी प्रतिवादींची विनंती आहे.

**१६.** प्रतिवादी क्र.०३ यांने वादीला पुरक व संमतीदर्शक लेखी कैफियत **निशाणी क्र.३९** ला पटलावर दाखल केली आहे. दावा मंजुर करण्यास आणि दाव्याद्वारे मागितलेला अनुतोष मंजुर करण्यास हरकत नसल्याचे प्रतिवादी क्र.०३ यांने नमुद केले. वादमिळकतीं वडीलोपार्जित असल्याचे, तसेच कमळया उर्फे कमळाकर राघो पाटील यांना सदर मिळकतींसंबंधाने मृत्युपत्र लिहुन ठेवण्याचा कोणताही वैधानिक हक्क व अधिकार नव्हता, असे प्रतिवादीचे कथन आहे. तथाकथित मृत्युपत्र बनावट, खोटे, खोडसाळ व अवैध असुन त्याअुनषंगाने नोंदविण्यात आलेला फेरफार क्र.४१३ चुकीचा असल्याचे प्रतिवादीचे कथन आहे. सदर फेरफार क्र.४१३ नोंदविण्यापुर्वी प्रतिवादी क्र.०३ यांना व वादीला नोटीसा देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे, कायदेशीर प्रक्रियेचे पालन न करता सदरचा फेरफार नोंदविण्यात आला असल्याने तो रद्द होण्यास पात्र आहे, असे प्रतिवादींचे कथन आहे.

**१७.** प्रतिवादी क्र.०३ याचे पुढे असे कथन आहे की, कमळया उर्फे कमळाकर राघो पाटील यांनी प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या लाभात मृत्युपत्राचा लेख कधीही लिहुन दिलेला नाही. केवळ, वादमिळकती लुबाडण्याच्या हेतुने प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी तोतया ईसम उभा करुन बनावट व खोटा मृत्युपत्राचा लेख अंमलात आणला आहे. त्यामुळे, तो अवैध व निरंर्थक असुन वादी व प्रतिवादी क्र.०३ यांच्यावर बंधनकारक नाही.

**१८.** प्रतिवादी क्र.०३ याने वादपत्रातील नमुद कथनांची पुर्नरावृत्ती त्याच्या लेखी कैफियतीमध्ये केली असल्याने, पुनरोक्ती टाळण्याकरीता सदरचे कथन याठिकाणी पुनर्नमुद करण्यात आले नाही. अंतिमतः प्रतिवादी क्र.०३ यांने दावा मंजुर करावा, मिळकतींचे वाटप करावे आणि मृत्युपत्राचा लेख रद्द करावा, या आशयाची विनंती केली आहे.

**१९.** प्रतिवादी क्र.०३ मयत झाल्यानंतर त्यांचे वारस प्रतिवादी क्र.३/१ ते ३/५ यांनी **निशाणी क्र.१०५** ला पुरशीस सादर करुन प्रतिवादी क्र.०३ यांने **निशाणी क्र.२९** ला दाखल केलेली लेखी कैफियत व म्हणणे

त्यांची लेखी कैफियत व म्हणणे असल्याचे स्विकारले.

**२०.** प्रतिवादी क्र.०४ ते ०६ यांनी त्यांची लेखी कैफियत **निशाणी क्र.३४** ला दाखल केली आहे. त्यांनी दाव्यासविरोध केला आहे. पुर्वीच वाटप झालेले असल्याने आणि जो तो ज्याच्या त्याच्या हिस्यास आलेल्या मिळकतीचा मालक व ताबेदार असल्याने दावा फेटाळण्या योग्य आहे, असे प्रतिवादींचे कथन आहे. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांनी लिहुन ठेवलेला मृत्युपत्राचा दस्त कायदेशीर व खरा असल्याचे प्रतिवादींनी तो मान्य केला आहे. दाव्यास आवश्यक पक्षकारांची उणिव या तत्वाची बांधा निर्माण होते. प्रतिवादी क्र.०४ ते ०६ यांच्या चुलत बहिणीं नामे, धाकली नागु म्हात्रे, तुळसाबाई कमळाकर पाटील आणि गंगुबाई महादु माळी, यांना दाव्यात पक्षकार म्हणुन जोडणे आवश्यक होते. परंतु, त्यांना दाव्यात पक्षकार म्हणुन जोडण्यात आलेले नाही. सबब, दाव्यास आवश्यक पक्षकारांची उणिव या तत्वाची बांधा निर्माण होते व त्या कारणांवरुन दावा खारिज करण्यास पात्र आहे. प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या लेखी कैफियतीमधील तथ्यांची पुनरावृत्ती प्रतिवादी क्र.०४ ते ०६ यांच्या लेखी कैफियतीमध्ये आढळुन येते. सबब, विस्तार वाढविण्याचे थांबविण्याकरीता सदरचे कथन याठिकाणी पुनर्नमुद करण्यात आलेले नाही. प्रतिवादी क्र.०४ ते ०६ यांनी दावा खर्चासह फेटाळण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

## विचाराधीन प्रश्न, त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसाः–

**२१.** पुर्वन्यायिक अधिकारी यांनी इंग्रजी भाषेमध्ये वादमुद्दे **निशाणी क्र.४१/ब** ला गठित केले आहेत. सदर मुद्दे मराठी भाषेत अनुवादीत करुन विचारार्थ घेवून, त्यावरील माझे सकारण निष्कर्ष पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| **०१.** | वादजमिनी आणि घर यामध्ये वादीचा हिस्सा आहे काय? जर होय, तर त्याचा हिस्सा किती? | **होय, अंतिम आदेशाप्रमाणे.** |
| **०२.** | दिनांक १६/०३/२००७ रोजीचे मृत्युपत्र गैरकायदेशीर आणि मुलतः निरर्थक (void-ab-initio) असल्याचे वादी सिध्द करतो काय? | **सिद्ध झाले नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ०३. | दावा मुदतीत आहे काय? | **होय, मुदतीत आहे.** |
| ०४. | आवश्यक पक्षकारांची उणिव या कारणाकरीता दावा त्रुटीपुर्ण आहे काय? | **नाही.** |
| ०५. | वादीने मागणी केल्याप्रमाणे, जाहिर घोषणेचा दिलासा मिळविण्यास तो पात्र आहे काय? | **अंशतः होकारार्थी.** |
| ०६. | वादीने मागणी केल्याप्रमाणे निरंतर ताकीदीचा (Perpetual Injunction) हुकूम मिळविण्यास वादी पात्र आहे काय? | **अंशतः होकारार्थी.** |
| ०७. | वादीने मागणी केल्याप्रमाणे वाटपाचा (Partition) व स्वतंत्र ताब्याचा (Separate Possession) दिलासा मिळविण्यास वादी पात्र आहे काय? | **अंशतः होकारार्थी.** |
| ०८. | प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी मागणी केल्याप्रमाणे नुकसान भरपाई स्वरुपातील खर्च (Compensatory costs) मिळविण्यास ते पात्र आहेत काय? | **नकारार्थी.** |
| ०९. | काय आदेश व हुकूमनामा? | **दावा खर्चासह अंशतः डिक्री करण्यात आला.** |

**वादी तर्फे मौखिक पुरावाः–**

**२२.** वादपत्रातील कथनांची सिध्दता करण्याकरीता वादी, गंगाराम कमळाजी उर्फ कमळाकर पाटील, (वा.सा.क्र.०१) याने पुरावा प्रतिज्ञापत्राद्वारे **(निशाणी क्र.४३)** ला दाखल केला आहे. त्याच्या पुराव्यास दुजोरा देण्याकरिता साक्षीदार श्री.प्रदिप थोरात (वा. सा. क्र. ०२) याची साक्ष **(निशाणी क्र.६९)** ला नोंदविण्यात आली आहे. याशिवाय, वादींनी अन्य कोणत्याही साक्षीदाराचा मौखिक पुरावा नोंदविलेला नाही. वादीने पुरावा देणे

बंद केल्याची पुरशीस **(निशाणी क्र.११७/क)** ला दाखल केली.

**वादीतर्फे दस्तऐवजांचा पुरावाः–**

२३. वादपत्रातील प्रपादन आणि तोंडी पुराव्यास पुष्टीकरण्याकरीता खालीलप्रमाणे नमुद दस्तऐवजांचा पुरावा वादींनी पटलावर सादर केला आहे.

| अ.क्र. | कागदपत्राचे विवरण | निशाणी क्रमांक. |
|---|---|---|
| ०१. | कै. कमळया उर्फ कमळाकर पाटील यांचे दिनांक २२/०१/२०१९ रोजीचे मृत्यूच्या दाखल्याची प्रत. | ४६. |
| ०२. | कै. धाकली कमळाकर पाटील यांचे दिनांक २२/०१/२००६ रोजीचे मृत्यूच्या दाखल्याची प्रत. | ४७. |
| ०३. | वादी यांनी दिनांक ०७/०१/२०२० रोजी ग्रुप ग्रामपंचायत सुडकोली यांना माहितीच्या अधिकाराखाली दिलेले पत्राची प्रत. | ४८. |
| ०४. | ग्रुप ग्रामपंचायत सुडकोली यांने माहितीच्या अधिकाराखाली दिनांक १४/०२/२०२० रोजी पुरविलेल्या माहितीचे पत्र व सोबतची कागदपत्रे. | ४९. |
| ०५. | ग्रुप ग्रामपंचायत सुडकोली यांने माहितीच्या अधिकाराखाली दिलेले दिनांक ०३/०९/२०२० रोजीचे पत्र. | ५०. |
| ०६. | वादीतर्फे दिनांक ३१/०१/२०२० रोजी उप अधिक्षक भुमि अभिलेख, अलिबाग, जि. रायगड यांना दिलेल्या पत्राची पोहचपावतीची प्रत. | ५१. |
| ०७. | उप अधिक्षक भुमि अभिलेख, अलिबाग, जि. रायगड यांचे दिनांक ११/०३/२०२० रोजीचे पत्र. | ५२. |
| ०८ | वादीने आपल्या वकिलामार्फत दिनांक ०४/०३/२०२० रोजी प्रतिवादी क्र.०१ ते ०६ यांना पाठविलेल्या नोटीसीची कार्यालयीन प्रत. | ५३. |

| | | |
|---|---|---|
| **०९.** | वादीने आपल्या वकिलामार्फत दिनांक ०४/०३/२०२० रोजी प्रतिवादी क्र.०१ ते ०६ यांना पाठविलेल्या नोटीसीची रजिस्टर्ड पावती. | **५४.** |
| **१०.** | वादीने आपल्या वकिलामार्फत दिनांक ०४/०३/२०२० रोजी प्रतिवादी क्र.०१ ते ०६ यांना पाठविलेल्या नोटीसीची पोस्टाची पोहोच पावती. | **५५.** |
| **११.** | वादी यांने प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या दिनांक १४/०३/२०२० रोजीच्या नोटीसीच्या उत्तरास दिनांक १४/०७/२०२० रोजीचे पाठविलेले प्रतिउत्तर. | **५६.** |
| **१२.** | वादी यांने प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या दिनांक १४/०३/२०२० रोजीच्या नोटीसीच्या उत्तरास दिनांक १४/०७/२०२० रोजी पाठविलेल्या प्रतिउत्तरांची रजिस्टर्ड पोस्टाची पावती. | **५७.** |
| **१३.** | वादी यांने दिनांक १४/०७/२०२० रोजी पाठविलेल्या प्रतिउत्तरांचा परत आलेला लखोटा. | **५८.** |
| **१४.** | वादीतर्फे दिनांक १७/०७/२०२० रोजी तहसिलदार साहेब, ता. अलिबाग, जि. रायगड यांना दिलेल्या पत्राची पोहोच पावती. | **५९.** |
| **१५.** | सातबाराच्या उता–याच्या प्रमाणित प्रती. | **६०.** |
| **१६.** | फेरफार नं.४१३ ची प्रमाणित प्रत. | **७०.** |
| **१७.** | मौजे–तळवली तर्फे उमटे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट क्र.११६, ४९६, ७५, ८१, १२०, ९४ च्या सातबारा उता–याच्या प्रमाणितप्रती. | **७१–१ ते ७१/६** |
| **१८.** | मौजे–तळवली तर्फे उमटे, ता. | **७२–१** |

| | | |
|---|---|---|
| | अलिबाग, जि. रायगड येथील गट क्र.११६, ४९६, ७५, ८१, १२०, ९४ च्या सातबारा उता–याच्या प्रमाणितप्रती. | **ते ७२–६** |
| **१९.** | मौजे–तळवली तर्फे उमटे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील एकत्रिकरणाचा उतारा. | **७३.** |
| **२०.** | मौजे–तळवली तर्फे उमटे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील आकारबंदची प्रमाणितप्रत. | **७४.** |
| **२१.** | मौजे–तळवली तर्फे उमटे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील जुना सर्वे नं.१०/१/क, सर्वे नं.१४/१ ते ११/१, सर्वे नं.०७/४, सर्वे नं.०७/१२ब, सर्वे नं.८६/१/ब, सर्वे नं.०९/३ या मिळकतींचे प्रमाणति सातबारा उतारे. | **७५–१ ते ७५–६** |
| **२२.** | फेरफार क्र.८८२ व १२३८ च्या प्रमाणित प्रती. | ७६–१ ते ७६/२ |
| **२३.** | कै. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांचे नोंदणीकृत मृत्यूपत्राची सही शिक्याची नक्कलाची सत्यप्रत. | **७७.** |

**प्रतिवादीचा मौखिक पुरावाः–**

**२४.** प्रतिवादी क्र.०१ जानु उर्फ जनार्दन कमळाकर पाटील (प्र.वा.सा.क्र.०१.) यांने पुराव्याचे प्रतिज्ञापत्र **निशाणी क्र.८१** ला पटलावर दाखल केले. मृत्युपत्राचा लेख सिद्ध करण्याकरीता प्रतिवादींनी साक्षीदार अशोक रघुनाथ पाटील (प्र.वा.सा.क्र.०२) याची साक्ष **निशाणी क्र.९८** ला नोंदविली आहे. त्याचप्रमाणे, दिपक जानु भुरे (प्र.वा.सा.क्र.०३) याची साक्ष **निशाणी क्र.०६** ला नोंदविली आहे. प्रतिवादींनी पुरावा देणे बंद केल्याची पुरशीस **निशाणी क्र.११२** ला पटलावर दाखल केली आहे.

**प्रतिवादी तर्फे दाखल कागदपत्रेः–**

**२५.** प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी मौखिक पुराव्यास दुजोरा देण्याकरीता मुळ मृत्युपत्राचा लेख **(निशाणी क्र.७८)**, विधिज्ञ श्री.

जी.के.पाटील यांनी वादीचे नोटीसीस दिलेल्या उत्तराची प्रत **(निशाणी क्र.८४)**, वादीने दिलेल्या दिनांक १४/०७/२०२० रोजीच्या उत्तरास प्रतिवादी क्र.०१ व ०२ तर्फे विधिज्ञ श्री. जी.के.पाटील यांनी दिलेल्या प्रतिउत्तराची सत्यप्रत **(निशाणी क्र.८५)** अशी कागदपत्रे पटलावर दाखल केली आहेत. याशिवाय, प्रतिवादींनी अन्य कोणतीही कागदपत्रे पटलावर दाखल केली नाहीत.

**विधिज्ञांचा युक्तीवादः–**

**२६.** वादीकरीता विद्वान विधिज्ञा श्रीमती. रेशमा पाटील, यांनी मौखिक तसेच लेखी युक्तीवाद निशाणी क्र.११५ ला पटलावर सादर केला. याउलट, प्रतिवादींकरीता विद्वान जेष्ठ विधिज्ञ श्री. व्ही. डी. कळके, यांनी केवळ मौखिक युक्तीवाद सादर केला. उभयतांनी त्याच्या युक्तीवादात मांडलेले मुद्दे, यापुढे न्यायनिर्णयामध्ये आवश्यक त्या ठिकाणी संदर्भांकिंत करुन त्यावर चर्चा करण्यात येईल.

**पुराव्यांचे विश्लेषण आणि तार्किक कारणमिमांसाः–**

**मुद्दा क्र.०१ करीताः–**

**२७.** वाद मालमत्तेमध्ये वादीचा अविभक्त हिस्सा असल्याचे घोषीत करावे आणि वादीचा हिस्सा तुटक व प्रथक करुन वादीच्या स्वतंत्र ताब्यात देण्यात यावा अशी वादीची मागणी आहे. त्याकरीता, वादीला सर्व प्रथम वाद मालमत्ता वडीलोपार्जित एकत्र कुटंबाच्या सहभाजक (coparcenary) असल्याचे सिध्द करावे लागेल. वादी असे कथन घेवुन आला आहे की, वाद मालमत्ता वडीलोपार्जीत असुन, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांना त्यांच्या भावांसोबत झालेल्या वाटपामध्ये सदर मालमत्ता त्यांच्या वाटया व हिस्यास मिळाल्या आहेत. त्यामुळे, वाद मालमत्ता कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या स्वताःच्या शाखेच्या संयुक्त कुटूंबाच्या अविभक्त मिळकतीं आहेत. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांचा मुलगा या नात्याने वादीचा सहभाजक (coparcener) म्हणुन वाद मालमत्तेत अविभक्त हिस्सा आहे.

**२८.** याउलट, प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांचे असे कथन आहे की, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याला वादमिळकतीं त्याच्या भावांसोबत झालेल्या कौटुंबिक वाटपामध्ये मिळालेल्या असल्याने, सदर मिळकतीं त्याच्या एकटयाच्या स्वतंत्र मालकी व ताबा वहिवाटीच्या मिळकतीं झाल्या.

त्यामुळे, सदर मिळकतींमध्ये वाटप मागण्याचा वादीला अधिकार नाही. प्रतिवादींचे पुढे असेही कथन आहे की, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने वादी व प्रतिवादीं यांच्यामध्ये दिनांक १०/०४/२००७ रोजी वादमिळकतींचे वाटप करुन दिलेले आहे. सदर वाटपाप्रमाणे हिस्यास मिळालेल्या मिळकतीं ज्याच्या त्याच्या ताब्यात व कब्जेवहिवाटीत आहेत.

**२९.** वादी व प्रतिवादी यांचे परस्परविरोधी कथन विचारात घेता, पटलावर आलेले निर्विवाद व उभयतांना मान्य व कबुल असलेली तथ्ये पुढील प्रमाणे आहेतः–

**अ.** वादी व प्रतिवादीं यांच्या कुटूंबाचे मुळे पुरुष राघो गणु पाटील होते.

**ब.** राघो गणु पाटील यांना गोविंद, नारायण व कमळया उर्फ कमळाकर अशी तीन मुले होती.

**क.** राघो गणु पाटील याच्या वडीलोपार्जित मिळकतींचे त्याची मुले गोविंद, नारायण आणि कमळया उर्फ कमळाकर यांच्यामध्ये वाटप करण्यात आले.

**ड.** गोविंद, नारायण आणि कमळया उर्फ कमळाकर यांच्यामध्ये झालेल्या वाटपात वादमिळकतीं कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या हिस्यास, मालकी व ताब्यात देण्यात आल्या.

**कमळाकर याचे वाटयास आलेल्या मिळकतींचे स्वरुपः–**

**३०.** उपरोक्त निर्विवाद तथ्यांच्या व्यतीरीक्त वादी व प्रतिवादीं यांच्यामध्ये कमळाकर याचे वाटयास आलेल्या वाद मालमत्तेच्या स्वरुपाबाबत विवाद आहे. वादीच्या कथनानुसार वाद मालमत्ता सहभाजक आहेत, तर प्रतिवादीच्या कथनानुसार त्या कमळाकर यांच्या विभक्त व स्वंतत्र मालमत्ता आहेत. परस्पर विरोधी प्रपादनाच्या पार्श्वभूमीवर, विवादाचा मुख्य प्रश्न असा उपस्थित होतो की, **वडीलोपार्जित मालमत्तेच्या वाटपात कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या वाटयाला आलेल्या वादमिळकतीं त्यांच्या पुत्रांच्या दृष्टीने सहभाजक (Coparcenary) मालमत्ता आहेत की त्याच्या स्वतंत्र मालमत्ता आहेत ?**

**३१.** तदअनुषंगाने, प्रतिवादींचे असे कथन आहे की, वडीलोपार्जित मालमत्तेच्या वाटपामध्ये कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या वाटयाला आलेल्या वादमिळकतीं त्यांच्या स्वतंत्र (Separate) स्वसंपादित मालमत्ता आहेत. त्यामध्ये वाटप मागण्याचा वादीला कोणताही हक्क व अधिकार नाही.

**३२.** प्रतिवादींनी उपस्थित केलेला आक्षेप हा मुख्यतः कायदेशीर परिणामांवर आधारित असुन, त्याच्या निराकरणासाठी पटलावर आलेली तथ्ये, उभय पक्षांचा मौखीक व दस्तऐवजांचा पुरावा, त्याचबरोबर लागु होणारी कायदेशीर तत्त्वे यांचे एकत्रित मुल्यमापन करणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकरणात वाटपात प्राप्त झालेली मालमत्ता स्वतंत्र मालमत्ता आहे की सहभाजक मालमत्ता, हे ठरविण्याकरीता पुढील बाबी विचारात घ्याव्या लागतीलः– (i) मूळ मालमत्तेचे स्वरूप काय होते; (ii) संबंधित व्यक्तीस ती मालमत्ता वाटपाद्वारे प्राप्त झाली काय; (iii) वाटपानंतर तो आपल्या शाखेतील सदस्यांसह संयुक्त हिंदू कुटुंबात कायम राहिला काय; आणि (iv) त्यानंतर त्या शाखेमध्येही सहभाजकत्व समाप्त करणारे कोणतेही विभाजन किंवा अन्य कायदेशीर कृत्य झाले काय. या बाबींच्या आधारेच वादमालमत्तांचे खरे कायदेशीर स्वरूप निश्चित करता येईल. तदअनुषंगाने, कायदेशीर तत्वांच्या प्रकाश झोतात, वादी व प्रतिवादींच्या मौखिक व पटलावर उपलब्ध दस्तऐवजांच्या पुराव्याचे मी बारकाईने वाचन व मुल्यांकन केले.

**३३.** वादी, गंगाराम कमळाजी पाटील (वा.सा.क्र.०१), याच्या उलटतपासामध्ये असे आले आहे की, राघो गणु पाटील हे त्यांचे आजोबा होते. त्यांना गोविंद, नारायण आणि कमळाकर अशी तीन मुले होती. त्याच्या आजोबांनी त्यांच्या मुलांमध्ये जमिनी वाटुन दिल्या होत्या. वाटपाप्रमाणे, त्याच्या वडीलांच्या हिस्यास आलेल्या मिळकतींचे ते मालक झाले. वाटपामध्ये त्याच्या वडीलांना मिळालेल्या मिळकतीं त्याच्या स्वतःच्या झाल्या.

**३४.** प्रतिवादींचे विद्वान जेष्ठ विधिज्ञ श्री.व्ही.डी. कळके यांनी युक्तीवादात असे नमुद केले की, वादीने उलटतपासामध्ये असे मान्य केले आहे की, राघो गणु पाटील, यांच्या मृत्युनंतर गोविंद, नारायण आणि कमळया उर्फ कमळाकर या त्यांच्या तीन मुलांमध्ये वडीलोपार्जित मिळकतींचे वाटप झाले. सदर वाटपामध्ये वादीचे वडील कमळया उर्फ कमळाकर राघो

पाटील याच्या वाटे हिस्यास आलेल्या मिळकतींचे ते मालक झाले, असे वादीने स्पष्टपणे कबुल केले आहे. त्याचप्रमाणे, सदर वाटपामध्ये त्याच्या वडीलांना मिळालेल्या मिळकतीं त्यांच्या स्वतःच्या झाल्या, असे देखील वादीने उलटतपासात कबुल केले आहे. सदर तथ्यांचा संदर्भ देत, प्रतिवादीच्या विधिज्ञांनी असे नमुद केले की, कौटुंबिक वाटपानंतर वडीलोपार्जित संयुक्त कुटूंबाच्या मिळकतींचे विभाजन होवून कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांचा हिस्सा तुटक व पृथक करुन त्यांच्या स्वतंत्र ताबा व कब्जेवहिवाटीस मिळाला. त्यामुळे वाटपानंतर, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या हिस्यास मिळालेल्या मिळकतींचा तो एकटा स्वतंत्र मालक होऊन, वादमालमत्ता त्याच्या स्वअर्जित व संपुर्ण मालकीच्या मिळकतीं झाल्या होत्या. त्यामुळे, सदर मिळकतींमध्ये वाटप मागण्याचा वादीला कोणताही हक्क व अधिकार नाही. त्यामुळे, वादीचा दावा फेटाळण्यास पात्र आहे.

**३५.** याउलट, वादीच्या विद्वान विधिज्ञा श्रीमती. रेशमा पाटील, यांनी असा युक्तीवाद सादर केला की, सर्वच वादमिळकतीं वडीलोपार्जित संयुक्त कुटूंबाच्या मालमत्ता असुन, त्यामध्ये वादीचा अविभक्त हिस्सा आहे. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांना वडीलोपार्जित मिळकतींमध्ये त्यांच्या भावांसोबत झालेल्या वाटपामध्ये मिळालेला वाटा, हिस्सा स्वतंत्र मालकीला मिळाला असला, तरी वादमालमत्ता वादी हा कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांचा मुलगा असल्याने त्यांचा देखील सदर वादमालमत्तेमध्ये जन्मतः हिस्सा आहे. त्यामुळे, वादमालमत्ता हिंदु एकत्र कुटुंबाच्या अविभक्त मालमत्ता असुन, त्यामध्ये वादीचा हिस्सा आहे.

**३६.** वादी व प्रतिवादींच्या यांच्या विधिज्ञांनी मांडलेल्या मुद्दयाचा व आक्षेपाचे विश्लेषन करण्यापुर्वी, त्यासंदर्भांत प्रचलित कायदेशीर तरतुदींचा संदर्भ याठिकाणी घेणे आवश्यक वाटते. त्यासंदर्भांत मुल्ला यांच्या हिंदु कायदयामधील परिच्छेद २२१ (४) व ३३९ मधील तरतुदींचा उल्लेख पुढीलप्रमााणे संदर्भांकरीता करण्यात येतो.

**३७.** **मुल्ला हिंदू कायदा (Mulla on Hindu Law, 22nd Edition, §§221(4) व 339)** मधील तरतुदीं आणि मा. सर्वोच्च न्यायालयाने स्थापीत केलेले मार्गदर्शक तत्व असे आहे की, हिंदु कायदयानुसार एकदा वाटप झाल्यानंतर प्रत्येक वाटेक–यास स्वतंत्र व निश्चित हिस्सा प्राप्त होतो

आणि तो हिस्सा त्यांची स्वतंत्र (स्वसंपादित) मालमत्ता बनतो. त्या मालमत्तेवर त्याचा संपुर्ण मालकी हक्क असतो आणि तो ती मालमत्ता आपल्या ईच्छेनुसार विकु शकतो, हस्तांतरीत करु शकतो किंवा मृत्युपत्राद्वारे कोणालाही देऊ शकतो. तथापि, वडीलोपार्जित मालमत्तेच्या वाटपामध्ये सहभाजकास प्राप्त झालेला हिस्सा हा त्याच्या संततीच्या दृष्टीने वडीलोपार्जित मालमत्ता असतो. वडीलोपार्जित मालमत्तेच्या वाटपात वडीलांच्या वाटयाला आलेली मालमत्ता जरी इतर नातेसंबंधाच्या दृष्टीने स्वतंत्र मालमत्ता असली, तरी त्याच्या पुत्र व नातवाच्या दृष्टीने ती सहभाजक (Coparcenary) मालमत्ता राहते. पुत्राचा जन्म होताच, वडीलांच्या वाटयाला आलेल्या वडीलोपार्जित मालमत्तेमध्ये त्याला जन्मतः हक्क प्राप्त होतो.

**३८.** उपरोक्त कायदेशीर तरतुदींच्या अनुषंगाने प्रस्तुत दाव्यातील पटलावर आलेल्या तथ्यांचा व पुराव्याचा विचार करता, असे स्पष्ट होत आहे की, राघो गणु पाटील याच्या वडीलोपार्जित मिळकतींचे, त्याच्या तीन मुलांमध्ये गोविंद, नारायण आणि कमळया उर्फ कमळाकर यांच्यात वाटप करण्यात आले. सदर वाटपाच्या अनुषंगाने फेरफार क्र.१२३८ **(निशाणी क्र.७६)** पटलावर सादर आहे. त्यातील नमुद मजकुर वादी व प्रतिवादींनी मान्य व कबुल केलेला आहे. सदर फेरफार क्र.१२३८ दिनांक २५/०२/१९५५ रोजी नोंदविण्यात आला आहे. त्यामध्ये असे स्पष्ट नमुद आहे की, गोवींद, नारायण आणि कमळया उर्फ कमळाकर यांनी वडीलोपार्जीत मिळकतींचे सुमारे दहा वर्षापुवी आपसात तोंडी वाटप करुन घेतले. त्यानुसार, प्रत्येकाच्या कब्जा वहीवाटीप्रमाणे महसुल अभिलेखात त्यांची नावे दाखल करण्यात आली. प्रत्येकाचे वाटया हिस्स्यास देण्यात आलेल्या मिळकतींचा स्पष्ट उल्लेख सदर फेरफारमध्ये करण्यात आला आहे. सदर फेरफार नोंदीतील मजकुरावरुन असे स्पष्ट होत आहे की, वादमालमत्ता कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचे वाटयाला देण्यात आलेल्या आहेत. वादमालमत्ता कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या वाटया हिस्यास देण्यात आल्याचे, त्याच्या भावांनी म्हणजेच, गोविंद व नारायण यांनी नाकारलेले नाही. त्याचप्रमाणे, सदरची बाब प्रतिवादीं यांनी देखील नाकारलेली नाही.

३९. पटलावर आलेल्या तथ्यांवरुन वादमालमत्तेचे मुळ स्वरुप वडीलोपार्जित असल्याचे स्पष्ट होत आहे. त्याचप्रमाणे, वादमालमत्ता भावंडाच्या वाटपामध्ये कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या हिस्यास वाटपाद्वारे प्राप्त झाली असल्याचे स्पष्ट होत आहे. गोविंद, नारायण आणि कमळया उर्फ कमळाकर यांचे वाटप झाल्यानंतर, कमळया उर्फ कमळाकर याचे त्याच्या मुलांसोबत संयुक्त हिंदु कुटूंब होते, ही बाब स्पष्ट होत आहे. त्यामुळे, वाटपानंतर कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या शाखेतील सदस्याकरीता त्याच्या वाटयास आलेली वादमालमत्ता संयुक्त हिंदु कुटूबांची मालमत्ता असल्याचे स्पष्ट झाले आहे.

४०. वडीलोपार्जित मालमत्तेच्या वाटपात वादीचे वडील (कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील) यांच्या वाटयाला वादमालमत्ता आलेल्या आहेत. त्यांच्या इतर नातेसंबंधाच्या किंवा भावांच्या दृष्टीने कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या वाटयाला वाटपाने आलेल्या वादमालमत्ता त्यांची स्वतंत्र (Separate) मालमत्ता ठरते. परंतु, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या पुत्र व नातवांच्या दृष्टीने वादमालमत्ता सहभाजक (Coparcenary) मालमत्ता राहते. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या पुत्रांचा त्यांच्या वाटयाला आलेल्या वडीलोपार्जित मालमत्तेमध्ये जन्मतः वाटा व हिस्सा बनतो. त्यामुळे, वडीलोपार्जित मालमत्तेच्या वाटपात कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या वाटयाला आलेल्या वादमालमत्तेत त्याच्या पुत्रांचा म्हणजेच, वादी व प्रतिवादीं यांना जन्मतः हक्क व अधिकार प्राप्त होतो. त्यामुळे, वादमालमत्ता जरी इतर नातेवाईकांच्या दृष्टीने कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या स्वतंत्र मालकीच्या मालमत्ता असल्या, तरी त्याच्या पुत्रांच्या दृष्टीने वादमालमत्ता सहभाजक (coparcenary) मालमत्ता असल्याचे स्पष्ट होत आहे. उपरोक्त नमुद कायदेशीर तरतुदींचा आणि पटलावर आलेल्या तथ्यांचा विचार करता, असे स्पष्ट होत आहे की, वादमिळकतीं कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या एकटयाच्या स्वतंत्र मालकीच्या मिळकतीं नसुन त्या मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादीं यांना कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचे पुत्र म्हणुन जन्मतःच हक्क प्राप्त आहे, या निष्कर्षाप्रत मी आलो आहे.

## सहदायकी संपत्तीचे सहभाजकांमधील कथित वाटपः–

**४१.** प्रतिवादींनी पुढे असा बचाव घेतला आहे की, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांनी त्यांच्या हयातीतच दिनांक १०/०४/२००७ रोजी वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वादमालमत्तेचे वाटप करुन प्रत्येकाच्या हिस्स्याच्या मिळकती त्यांच्या स्वतंत्र ताब्यात व कब्जेवहीवाटीत दिल्या आहेत. त्यामुळे, वादमालमत्ता आजरोजी हिंदु एकत्र कुटूंबाच्या अविभक्त मिळकतीं राहिलेल्या नाहीत. त्यामुळे, वादीचा वादमालमत्तेमध्ये कोणताही हिस्सा किंवा अधिकार नाही. याउलट, वादीने अशा कोणत्याही वाटपाचा स्पष्ट इन्कार केला आहे. उलटपक्षी, वादमालमत्ता आजही हिंदु एकत्र कुटूंबाच्या अविभक्त मालमत्ता असुन, वादीचा त्यामध्ये अविभक्त हिस्सा आहे, असे प्रतिपादन केले आहे.

**४२.** वादी व प्रतिवादींच्या उपरोक्त परस्परविरोधी प्रपादनांच्या पार्श्वभुमीवर प्रस्तुत दाव्यातील महत्वाचा दुसरा विवादीत प्रश्न असा उपस्थीत होतो की, **दिनांक १०/०४/२००७ रोजी कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या मुलांमध्ये कथित वाटप प्रत्यक्षात झाले होते काय?**

**४३.** कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांना वादमालमत्ता त्यांच्या भावंडाच्या वाटपामध्ये वाटया हिस्याला मिळाली असल्याचे, पटलावर आलेल्या तथ्यांवरुन सिध्द झाले आहे. कायदयाचे असे प्रस्थापित तत्व आहे की, वडीलोपार्जित मालमत्तेच्या वाटपात वडीलांच्या वाटयाला आलेली मालमत्ता ही त्यांच्या पुत्र व नातवांच्या दृष्टीने सहभाजक (Coparcenary) मालमत्ता असते. प्रस्तुत दाव्यामध्ये, प्रतिवादींने असा बचाव पुढे केला आहे की, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांना वाटपामध्ये वादमालमत्ता मिळाल्यानंतर दिनांक १०/०४/२००७ रोजी त्यांनी वादमालमत्तांचे त्यांच्या मुलांमध्ये वाटप करुन दिले. प्रतिवादींने कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या मिळकतींचे त्यांच्या मुलांमध्ये वाटप झाल्याचे स्पष्ट कथन केले असल्यामुळे, वाटपाची बाब सिद्ध करण्याचे पुराव्याचे ओझे प्रतिवादींवर आहे.

**४४.** प्रतिवादी जानु उर्फ जनार्दन कमळाकर पाटील यांने त्याच्या सरतपासामध्ये असे नमुद केले आहे की, दिनांक १०/०४/२००७ रोजी वादीच्या मागणीनुसार कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांनी त्यांच्या वडीलोपार्जित मिळकतींचे वाटप केले. सदर वाटपामध्ये गट क्र.१२० ही

मिळकत, त्यातील बेडे आणि बेडयामधील रुपये दोन लक्ष किंमतीची सागाची लाकडे वादी गंगाराम याच्या हिस्यास देण्यात आले. त्याचप्रमाणे, सदर वाटपामध्ये गट क्र.११६ व गट क्र.४९६ या मालमत्ता प्रतिवादी क्र.०१ जनार्दन व प्रतिवादी क्र.०२ बाळाराम यांच्या हिस्यास देण्यात आल्या. तसेच, गट क्र.७५, ८१ व ९४ या मिळकतीं प्रतिवादी क्र.०३ शिवराम याच्या हिस्यास देण्यात आल्या. त्याचप्रमाणे, ग्रामपंचायत सुडकोली घर क्र.१७५ पुर्णपणे जानु ऊर्फ जनार्दन याच्या मालकी व हिस्स्यास देण्यात आले.

**४५.** प्रतिवादींनी त्याच्या सरतपासातील मजकुराच्या पृष्टयर्थ वाटपाचा अन्य कोणताही पुष्टीकारक पुरावा पटलावर सादर केलेला नाही. प्रत्यक्षात वाटपाच्या वेळी उपस्थित असलेल्या साक्षीदारांची साक्ष वाटप सिद्ध करण्याकरीता, प्रतिवादींनी नोंदविलेली नाही. वाटप सिद्ध करण्याकरीता केवळ प्रतिवादीच्या एकटयाच्या साक्षीपुराव्याशिवाय अन्य कोणताही त्याच्या कथनांस दुजोरा देणारा पुरावा पटलावर आलेला नाही.

**४६.** प्रतिवादी कथन करीत असल्याप्रमाणे कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या मिळकतींचे त्याच्या मुलांमध्ये प्रत्यक्षात वाटप करण्यात आले असते, तर साहजिकच सदर वाटपाच्या अनुषंगाने फेरफार नोंद महसुल अभिलेखामध्ये नोंदविण्यात आली असती. तथापी, प्रतिवादींनी त्यांच्या तोंडी कथनाशिवाय दिनांक १०/०४/२००७ रोजीचे वाटप सिद्ध करणारा पुष्टीकारक पुरावा पटलावर सादर केलेला नाही.

**४७.** विशेष उल्लेखाची बाब म्हणजे, वादी, गंगाराम कमळाजी पाटील याच्या उलटतपासामध्ये दिनांक १०/०४/२००७ रोजीचे वादी व प्रतिवादीं यांच्यामध्ये वादमालमत्तांचे प्रत्यक्षात वाटप झाल्याचे किंवा त्यानुसार त्यांनी स्वतंत्र ताबा हिस्सा स्विकारल्याचे सिद्ध करणारा कोणताही स्पष्ट मजकुर किंवा तथ्यें पटलावर आणलेली नाहीत.

**४८.** सर्वसामान्यपणे, वाटप सिद्ध करण्याकरीता नोंदणीकृत वाटपपत्र, लेखी वाटपयादी, महसुली अभिलेखातील तत्संबंधित फेरफार किंवा स्वतंत्र ताबा व कब्जेवहिवाट सिध्द करणारी खात्रीदायक कागदपत्रे किंवा स्वतंत्र व विश्वासार्ह साक्षीदारांचा साक्षीपुरावा पटलावर सादर करणे आवश्यक असते. प्रतिवादीने दिनांक १०/०४/२००७ रोजीच तथाकथित वाटप ज्या साक्षीदारांच्या समक्ष करण्यात आले, त्यांची साक्ष नोंदविलेली नाही. त्याचप्रमाणे, दिनांक १०/०४/२००७ रोजीच्या वाटपाप्रमाणे महसुल

अभिलेखात स्वतंत्र ताबा व वहिवाटीच्या नोंदी झाल्याबाबतचा पुरावा पटलावर सादर केलेला नाही. वाटपाबाबत कोणतेही वाटपपत्र किंवा वाटपाची यादी पटलावर सादर केलेली नाही. केवळ वाटप झाले, असे प्रतिपादन करणे हा वाटपाचा पुरावा ठरु शकत नाही. वाटप झाले असे प्रतिपादन करणा–या पक्षकारांने प्रत्यक्षात वाटप आणि वाटपानुसार ज्याच्या त्याच्या हिस्यास आलेल्या मालमत्तेचा स्वतंत्र ताबा व कब्जेवहिवाट सिद्ध करणारा पुरावा पटलावर आणणे अभिप्रेत होते. परंतु, प्रस्तुत दाव्यात वादीने दिनांक १०/०४/२००७ रोजीचे कथित वाटप सिद्ध करणारा त्याच्या एकटयाच्या कथनाशिवाय अन्य कोणताही सबळ व विश्वासार्ह पुरावा पटलावर सादर केलेला नाही.

**४९.** पटलावर दाखल वादमालमत्तेच्या महसुल अभिलेखांचे जसे की, सातबारा, फेरफार उतारे यांचे अवलोकन करता, असे स्पष्ट होत आहे की, वादमालमत्तेपैकी, गट क्र.११६ व ४९६ या मिळकतींना प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या नावाची नोंद मृत्युपत्राच्याआधारे करण्यात आलेली आहे. त्यापुर्वी, गट क्र.११६ व ४९६ यामिळकतीं कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्याच नावे होती. वादमालमत्तांपैकी, गट क्र.७५, गट क्र.८१, गट क्र.१२० गट क्र.९४ यामिळकतीं कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्याच नावाने आहेत. त्याचप्रमाणे, ग्रामपंचायत सुडकोली घर क्र.१७५ ही मिळकत देखील कमळया ऊर्फ कमळाकर राघो पाटील याच्याच नावे होते. सदर मिळकतींचे वाटप होऊन वादी व प्रतिवादींच्या स्वतंत्र मालकी व हिस्स्यास प्रत्यक्षात क्षेत्र आल्याबाबतच्या नोंदी महसुल अभिलेखात अद्यापपर्यंत करण्यात आल्या नसल्याचे स्पष्ट होत आहे. केवळ मृत्युपत्राच्या आधारे प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी केवळ दोन मिळकती त्यांच्या नावे नोंदवुन घेतल्या असल्याचे स्पष्ट दिसुन येते.

**५०.** प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे, गट क्र.१२० ही मिळकत जर वादीच्या वाटे हिस्यास देण्यात आली असती, तर निश्चितच वाटपाच्याआधारे गट क्र.१२० ही मिळकत वादीच्या नावे महसुल अभिलेखात नोंदविण्यात आली असती आणि, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचे नाव कमी करण्यात आले असते. त्याचप्रमाणे, गट क्र. ७५, ८१ व ९४ यामिळकतीं शिवराम याच्या हिस्यास देण्यात आल्या असत्या, तर सदर मिळकतींच्या सातबारा व महसुल अभिलेखामध्ये त्यांची नावे नोंदविण्यात आली असती.

परंतु, आजही सदर मिळकतीं कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्याच नावाने असल्याचे स्पष्ट होत आहे.

**५१.** प्रतिवादींनी कथन केल्याप्रमाणे, जर खरोखरच वाटप झाले असते, तर त्यासंदर्भात वाटपाचा ठोस पुरावा प्रतिवादींना पटलावर सादर करता आला असता. परंतु, प्रत्यक्षात वाटप झालेले नसल्याने वाटपाबाबतचा ठोस व पुष्टीकारक पुरावा प्रतिवादींना पटलावर सादर करता आला नाही, असे स्पष्ट होत आहे. केवळ, प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या लाभात तथाकथित, दिनांक १६/०५/२००७ रोजीचा मृत्युपत्राचा लेख असल्याने त्याच्या समर्थनार्थ वाटप झाल्याचा बचाव, प्रतिवादींनी पुढे केला असल्याची शक्यता नाकारता येणार नाही.

**५२.** मृत्युपत्राच्या लेखाआधारे वादमालमत्तेपैकी, गट क्र.११६ व ४९६ या मिळकतीं स्वतःला मिळाव्यात, त्यात कोणताही कायदेशीर अडसर येवू नये, म्हणुन प्रतिवादींनी वाटप झाल्याचा बचाव पुढे केला असल्याचे स्पष्ट होत आहे. जर वाटप झाले नाही, तर एकत्र कुटूंबाच्या मिळकतींचे कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या नावे असलेले मृत्युपत्र वैध ठरणार नाही, या भितीने प्रतिवादींनी वाटप झाल्याचा बचाव पुढे केला असल्याचे स्पष्ट होत आहे. परंतु, सदर कथनांच्या अनुषंगाने ठोस व पुष्टीकारक पुरावा पटलावर आणलेला नाही. सबब, प्रतिवादींनी दिनांक १०/०४/२००७ रोजीचे वाटप पुराव्यानिशी सिद्ध केले नसल्याने, सर्वच वादमालमत्ता आजही वादी व प्रतिवादीं यांच्या वडीलोपार्जित संयुक्त मालकीच्या मिळकतीं असल्याचे सिद्ध होत आहे. वादमालमत्ता वडीलोपार्जित संयुक्त मालकीच्या अविभक्त मिळकतीं असल्याने, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांचा पुत्र म्हणुन वादीला सदर मिळकतींमध्ये जन्मतःच हक्क व हिस्सा आहे, या निष्कर्षाप्रत मी आलो आहे.

## <u>सहदायकी संपत्तीतील हितसंबंधाची प्रक्रांतीः–</u>

**५३.** कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या वडीलोपार्जित मिळकतींचे त्याच्या हयातीत किंवा त्याच्या मृत्युनंतर त्यांच्या मुलां–मुलींमध्ये वाटप झाले नसल्याचे सिद्ध होत आहे. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांना चार मुले नामे, गंगाराम, जानु उर्फ जनार्दन, बाळाराम व शिवराम, याशिवाय तीन मुली नामे, देवूबाई, वंदना व आशा असे वारस असल्याचे पटलावर आलेले आहे.

५४. **हिंदु उत्तराधिकारी अधिनियमाच्या कलम ०६** मधील तरतुदींनुसार जेव्हा एखादा हिंदू पुरुष या अधिनियमाच्या प्रारंभानंतर मृत्यु पावला असून त्याच्या मृत्युसमयी मिताक्षरा सहदायकी संपत्ती त्याचा हितसंबंध असेल तेव्हा, त्याचा त्या संपत्तीतील हितसंबंध उत्तरजीवीत्वाच्या तत्वानुसार सहदायकीतील उत्तरजीवी सदस्याकडे प्रकांत होतो.

५५. उपरोक्त, उल्लेखित कायदेशीर तरतुदींच्या अनुषंगाने प्रस्तुत दाव्यातील तथ्यांचे अवलोकन करता, असे स्पष्ट होत आहे की, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याला वडीलोपार्जित मिळकतींमध्ये त्याच्या भावांसोबत झालेल्या वाटपामध्ये वादमालमत्ता वाटा व हिस्यास मिळालेल्या आहेत. परिणामी, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील, यांना भाऊ वाटपामध्ये मिळालेली मिळकत त्यांच्या पुत्रांसाठी वडीलोपार्जित सहदायकी संपत्ती ठरते. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांचा तसेच त्यांच्या मुलां–मुलींचा सहदायक म्हणुन समसमान अविभक्त हिस्सा सदर सहदायकी संपत्ती मध्ये असल्याचे स्पष्ट होत आहे. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांनी त्याच्या हयातीमध्ये मृत्युपत्राचा लेख लिहुन ठेवलेला आहे, असे प्रतिवादींचे कथन आहे. अशा परिस्थीतीत, सहदायकी मालमत्तेमधील कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांचा हिसा काल्पनिक वाटपामध्ये गृहित धरावा लागेल. त्यानुसार, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील, यांच्या हयातीमध्ये सहदायकी मालमत्तेचे वाटप करावयाचे झाल्यास सदर सहदायकी मालमत्तेमध्ये कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील आणि त्याच्या सर्व मुलां मुलींचा समसमान हिस्सा बनतो. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील, यांना चार मुले आणि तीन मुली असे एकुण सात वारस आहेत. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांना स्वतःला आणि त्याच्या मुलां मुलींना वादमालमत्तेमध्ये प्रत्येकी १/८ हिस्सा निर्माण होतो. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने गट क्र.११६ व ४९६ या मिळकतींसंबंधाने मृत्युपत्राचा लेख प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या लाभात लिहुन दिलेला आहे. त्यामुळे, गट क्र.११६ व ४९६ मधील कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचा १/८ हिस्सा प्रतिवादी क्र.०१ व ०२ मिळविण्यास पात्र आहेत. परंतु, इतर वादमालमत्ता गट क्र.७५, ८१, १२० व ९४ आणि ग्रामपंचायत घर क्र.१७५ या मिळकतींसंबंधाने कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने मृत्युपत्राद्वारे हस्तांतरण केलेले नाही. त्यामुळे, कमळया उर्फ कमळाकर राघो

पाटील याच्या मृत्युनंतर सदर मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादी यांचा प्रत्येकी १/७ अविभक्त हिस्सा निर्माण होतो. परिणामी, मुद्दा क्र.०१ चा निष्कर्ष त्याप्रमाणे होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.०२ करीताः–**

**५६.** वादमालमत्तेपैकी, गट क्र.११६ व ४९६ या मिळकतींवर प्रतिवादी क्र.०१ व ०२ त्याचा मालकी हक्क प्रतिपादन करीत आहेत. प्रतिवादींचे असे कथन आहे की, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने त्याच्या मालकीच्या उपरोक्त उल्लेखित मालमत्ता मृत्युपत्रीयदानाने त्याच्या मालकी व ताबे कब्जेवहिवाटीत दिल्या आहेत. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचा आणि धाकलीबाई कमळया उर्फ कमळाकर पाटील यांची प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी सेवासुश्रुषा, सांभाळ, देखभाल, वेळ प्रसंगी औषधोपचार व इतर सर्व खर्च केला असल्याने, सदर मिळकतीं नोंदणीकृत मृत्युपत्राने कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने त्यांना दान दिल्या आहेत.

**५७.** याउलट, वादीने असा बचाव पुढे केला आहे की, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील हा वयोवृध्द झालेला होता. वृध्दापपणामुळे तो शारीरिक व मानसिक दृष्टया थकला होता. त्याची शारीरिक व मानसिक स्थीती प्रचंड खालावलेली होती. त्याला हिंडता फिरता येत नव्हते. तो अशिक्षीत व अडाणी होता. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने कधीही प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या लाभात मृत्युपत्राचा लेख लिहुन दिलेला नाही. तथाकथित मृत्युपत्राचा लेख बनावट, खोटा असुन तोतया ईसमांला कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील असे भासवून सदरचा दस्त प्रतिवादींनी निष्पादित केला आहे. त्यामुळे, सदर दस्तांच्या आधारे प्रतिवादींना वादमालमत्तेसंबंधाने कोणतेही हक्क व अधिकार प्राप्त होत नाहीत. वादीचे पुढे असेही कथन आहे की, वादमालमत्ता वडीलोपार्जित हिंदू एकत्र कुटूंबाच्या मिळकतीं असल्यामुळे, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याला वादमालमत्तेसंबंधाने मृत्युपत्र लिहुन ठेवण्याचा कोणताही वैध अधिकार नव्हता. त्यामुळे, अधिकार नसतांना निष्पादित करुन घेतलेले मृत्युपत्र अंमलनीय नाही. सदर मृत्युपत्राच्याआधारे प्रतिवादींना कोणताही मालकी हक्क प्राप्त होत नाही.

**५८.** विद्वान विधिज्ञ श्रीमती. रेशमा पाटील, यांनी पुढे असे नमुद केले की, वादमालमत्ता वडीलोपार्जित मिळकती असुन कौटुंबिक वाटपामध्ये त्या कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या हिस्यास आलेल्या आहेत. वादी व प्रतिवादी हे कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांची संतती असल्यामुळे, त्यांचा सदर मिळकतींमध्ये अविभक्त हिस्सा व अधिकार आहे. प्रतिवादींनी वादीचा हिस्सा डावलण्याकरीता मृत्युपत्राचा लेख कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या नावे तोतया ईसम उभा करुन निष्पादित करुन घेतलेला आहे. वास्तविक सदर दस्त ज्या तारखेला नोंदविण्यात आला, त्या तारखेला कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील आजारी होते. वृध्दापकाळामुळे ते मानसिक व शारिरीक दृष्टया थकले होते. त्यांना निट ऐकू येत नव्हते. त्यांची शारिरीक व मानसिक स्थीती प्रचंड खालावली होती. त्यामुळे, कोणतेही मृत्युपत्र निष्पादित करण्याच्या शारीरिक व मानसिक स्थीती मध्ये ते नव्हते. प्रत्यक्षात, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील, यांनी कोणताही मृत्युपत्राचा दस्त प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या लाभात लिहुन दिलेला नाही. तसा दस्त दावा मिळकतींसंबंधाने निष्पादित करण्याचा त्यांना कोणताही वैध व कायदेशीर हक्क व अधिकार नव्हता. सदरचे मृत्युपत्र दिनांक १६/०५/२००७ रोजीचे मृत्युपत्र खोटे, खोडसाळ, बनावट व अवैध आहे. त्याआधारे, प्रतिवादींना वादमिळकतींसंबंधाने कोणताही मालकी हक्क प्राप्त होत नाही. विद्वान विधिज्ञ श्रीमती. रेशमा पाटील, यांनी त्यांच्या युक्तीवादा पृष्टयर्थ पुढील न्यायनिर्णयाचा दाखला दिला आहे.

**अंबिका प्रसाद उर्फ अंबिका प्रसाद पांडे व इतर**
**विरुध्द**
**शाम बिहारी व इतर**
**दुसरे अपिल क्र.१६७/२०२३**
**निकाल दिनांक–०२/०५/२०२५**

मा. अल्हाबाद उच्च न्यायालयाने सदर प्रकरणामध्ये असे निरिक्षण नोंदविले आहे की, मृत्युपत्राचा पुरावा हा इतर कोणत्याही दस्तऐवजांच्या पुराव्यापेक्षा अधिक कठोर निकषांवर तपासला जातो. मृत्युपत्र केवळ भारतीय पुरावा अधिनियमाच्या कलम ६८ ते ७१ नुसार आणि भारतीय उत्तराधिकार अधिनियमाच्या कलम ६३ नुसार विधीपुर्वक सिद्ध झाले, एवढेच

> पुरेसे नसते. जर न्यायालयासमोर विरोधी पक्षाने उपस्थीत केलेल्या किंवा न्यायालयाच्या निदर्शनास आलेल्या कोणत्याही संशयास्पद परिस्थीती अस्तित्वात असतील, तर त्या परिस्थीतीत मृत्युपत्र मांडणा-या व्यक्तींने (Propounder of the Will) समाधानकारकरित्या स्पष्ट करुन दुरु करणे आवश्यक असते. अन्यथा, विवादीत मृत्युपत्र हे मृत्युपत्र कर्त्याचे वैध आणि अंतिम मृत्युपत्र आहे, असे मांडता येणार नाही.

**५९.** याउलट, वादीच्या विधिज्ञांनी सादर केलेल्या युक्तीवादाचे खंडंण करतांना असे नमुद केले आहे की, मृत्युपत्राचे निष्पादन सिद्ध करण्याकरीता प्रतिवादींनी मृत्युपत्राच्या साक्षीदाराची साक्ष नोंदविलेली आहे. त्याच्या साक्षपुराव्यामध्ये मृत्युपत्राचे निष्पादन व नोंदणीचे खंडण करणारे तथ्ये किंवा मजकुर पटलावर आलेला नाही. केवळ, वादपत्रातील कथनांच्याआधारे कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांनी मृत्युपत्राचा लेख लिहुन ठेवला नाही, असे अनुमान काढता येणार नाही. मृत्युपत्राच्या लेखावरील मृत्युपत्रकर्ता याचा निशाणी अंगठा आणि साक्षीदारांची स्वाक्षरी प्रतिवादीने मृत्युपत्राच्या साक्षीदारामार्फत सिद्ध केली आहे. मृत्युपत्राचे निष्पादन साक्षीदारांने साक्षीपुराव्याद्वारे सिद्ध केले आहे. सदर युक्तीवादा पृष्टयर्थ विद्वान विधिज्ञ श्री.व्ही.डी. कळके यांनी पुढे उल्लेखित न्यायनिर्णयांचा दाखला दिला आहे.

**2025 INSC 1451**
**K S Dinachandran Vs Shyla Joseph**

> मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर न्यायनिर्णयामध्ये असे निरिक्षण नोंदविले आहे की, मृत्युपत्राच्या साक्षीदारांनी त्याच्या साक्षपुराव्याद्वारे मृत्युपत्राचे निष्पादन व साक्षांकन विस्तृतपणे कथन केल्यास आणि त्यांच्या उलटतपासामध्ये सदर तथ्यांचे खंडण करणारा कोणताही मजकुर पटलावर न आल्यास सदर साक्षीदारांच्या साक्षीपुराव्याआधारे मृत्युपत्राचे साक्षांकन व निष्पादन सिद्ध होते.

**६०.** प्रतिवादींनी मृत्युपत्राच्या लेखाआधारे वादमालमत्तेवर मालकी हक्क प्रतिपादन केला आहे. कायदयाचे असे प्रस्थापित तत्व आहे की, मृत्युपत्राच्याआधारे मालमत्तेवर हक्क सांगणा-या व्यक्तींला मृत्युपत्राचे निष्पादन

सिद्ध करावे लागते. मालमत्ता हस्तांतरीत करणारा इतर कोणताही लेख किंवा दस्त त्याच्या निष्पादनाच्या तारखेपासुन अंमलात येतो. परंतु, मृत्युपत्राचे तसे नाही. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युनंतर मृत्युपत्र अंमलात येत असल्यामुळे, मृत्युपत्रकर्ता, मृत्युपत्राचे निष्पादन, साक्षाकंन, शारीरिक व मानसिक स्थिती यासंदर्भांत साक्ष देण्यासाठी उपलब्ध नसतो. त्यामुळे, मृत्युपत्राची सिद्धता करण्याकरीता मृत्युपत्राच्या लाभार्थी यास विश्वासार्ह, ठोस, पुष्टीकारक व समाधानकारक पुरावा पटलावर सादर करुन पुढील बाबी सिध्द करणे आवश्यक असतेः–

**अ.** मृत्युपत्रावर मृत्युपत्रकर्त्याने स्वतःची स्वाक्षरी किंवा अंगठा निशाणी केला होता;

**ब.** दोन किंवा अधिक साक्षीदारांनी मृत्युपत्रावर साक्षाकंन केले होते;

**क.** मृत्युपत्राच्या निष्पादनाच्यावेळी मृत्युपत्रकर्ता सुदृढ, चांगल्या व निर्णयक्षम मनस्थितीत (Sound and Disposing State of Mind) होता;

**ड.** मृत्युपत्राचा विषय असलेल्या सर्व मालमत्ता मृत्युपत्राद्वारे प्रदान (bequeath) करण्याचा पुर्ण अधिकार व क्षमता मृत्युपत्रकर्ता यास होती.

**<u>मृत्युपत्राचे निष्पादन आणि साक्षांकनः–</u>**

**६१.** प्रस्तुत दाव्यामध्ये, प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी असा बचाव घेतला आहे की, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने त्यांच्या लाभात मृत्युपत्राचा लेख लिहुन ठेवला आहे. त्या मृत्युपत्राच्या लेखाआधारे प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी वादमालमत्तांपैकी गट क्र.११६ व ४९६ या मिळकतींवर मालकी हक्क व ताबा प्रतिपादन केला आहे. सबब, तथाकथित मृत्युपत्राचा लेख सिद्ध करण्याचे दायित्व प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्यावर असल्याचे स्पष्ट होते.

**६२.** सर्व प्रथम, तथाकथित मत्युपत्राच्या दस्तावर मृत्युपत्रकर्ता याची स्वाक्षरी किंवा अंगठा निशाणी केला ही बाब प्रतिवादींना सिद्ध करावी लागेल. त्याचप्रमाणे, दोन साक्षीदारांच्या समक्ष सदर मृत्युपत्राच्या दस्ताचे साक्षाकंन करण्यात आले, ही बाब देखील सिद्ध करण्याचे दायित्व प्रतिवादींवर आहे.

**६३.** मृत्युपत्रावरील निशाणी अंगठा कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील याचा आहे, हे सिद्ध करण्याकरीता प्रतिवादींनी मृत्युपत्राचे साक्षीदार अशोक रघुनाथ पाटील (प्र.वा.सा.क्र.०२) यांची साक्ष **निशाणी क्र.९८** ला नोंदविलेली आहे. त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये त्यांने स्पष्टपणे नमुद केले आहे की, मृत्युपत्राचा लेख तयार केल्यानंतर अनंता गायकर यांनी तो वाचुन दाखविला. कमळाकर राघो पाटील यांनी तो बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर, कमळाकर राघो पाटील यांनी त्यावर त्यांचा निशाणी अंगठा केला. सदर अंगठयाखाली अनंता गायकर यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर, साक्षीदार म्हणुन त्यांने स्वतः स्वाक्षरी केली. दुसरा साक्षीदार सदाशिव लक्ष्मण पाटील यांने देखील सदर लेखावर स्वाक्षरी केली. मृत्युपत्राच्या लेखावरील कमळाकर राघो पाटील यांचा निशाणी अंगठा सदर साक्षीदारांने ओळखला.

**६४.** सदर साक्षीदाराच्या उलटतपासामध्ये असा कोणताही प्रतिकुल मजकुर पटलावर आलेला नाही. ज्यावरुन, कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांनी मृत्युपत्राच्या लेखावर निशाणी अंगठा केला नाही, असे सिद्ध होईल. मृत्युपत्राच्या लेखावर मृत्युपत्र लिहुन ठेवणार म्हणुन असलेला निशाणी अंगठा कमळाकर राघो पाटील यांचाच असल्याचे मृत्युपत्राचा साक्षीदार अशोक रघुनाथ पाटील याच्या साक्षपुराव्यावरुन सिद्ध झाले आहे. मृत्युपत्रकर्ता यांने साक्षीदारांसमक्ष मृत्युपत्राच्या लेखावर अंगठा निशाणी केला असल्याचे सिद्ध झाले आहे. त्याचप्रमाणे, मृत्युपत्रकर्ता कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या समक्ष साक्षीदारांनी मृत्युपत्राच्या लेखावर साक्षीदार म्हणुन स्वाक्षरी केली असल्याचे सिद्ध झाले आहे.

**६५.** पटलावर आलेल्या पुरावा व तथ्यांवरुन तथाकथित मृत्युपत्राचा लेख **निशाणी क्र.७८** वरील अंगठा निशाणी कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांची असल्याचे सिद्ध झाले आहे. त्याचप्रमाणे, मृत्युपत्रकर्ता यांने साक्षीदारांसमक्ष आणि साक्षीदारांनी मृत्युपत्रकर्ता याच्या समक्ष मृत्युपत्राच्या लेखावर अनुक्रमे निशाणी अंगठा व स्वाक्षरी केली असल्याचे सिद्ध झाले आहे. मृत्युपत्राच्या लेखामध्ये मृत्युपत्र करुन ठेवणार म्हणुन असलेला निशाणी अंगठा कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील याचा नाही, असे दर्शविणारा कोणताही मजकुर किंवा तथ्ये मृत्युपत्राच्या साक्षीदाराच्या उलटतपासामध्ये पटलावर आलेला नाही. सदरचा दस्त नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. दस्त नोंदीच्या वेळी कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांने दुय्यम

निबंधक यांच्या समक्ष हजर राहुन सदर मृत्युपत्राच्या लेखासोबत जोडलेल्या दस्त गोषवारा भाग ०१ व भाग ०२ यावर निशाणी अंगठा केलेला आहे. त्याचप्रमाणे, मृत्युपत्रकर्ता कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांचे छायाचित्र सदर मृत्युपत्राच्या गोषवा–यांवर आहे. यावरुन, मृत्युपत्राचा लेख **निशाणी क्र.७८** हा कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांनेच निष्पादित केला असल्याचे सिद्ध होत आहे. यासर्व, तथ्यांचा व पटलावर आलेल्या परिस्थितींचा विचार करता, प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी भारतीय उत्तराधिकारी कायदा, १९२५ मधील कलम ६३ व ६८ प्रमाणे मृत्युपत्राचे निष्पादन आणि साक्षाकंन सिद्ध केले, या निष्कर्षाप्रत मी आलो आहे.

## मृत्युपत्रकर्ताची शारीरिक व मानसिक क्षमता व स्थितीः–

**६६.** वादीचा असा आक्षेप आहे की, मृत्युपत्राच्या निष्पादनाच्या वेळी मृत्युपत्रकर्ता कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील हा आजारी होता. तो शारीरिक व मानसिक दृष्टया थकलेला होता. तो अशिक्षीत होता. तो हिंडण्या फिरण्याच्या परिस्थितीत नव्हता. तो नेहमी आजारी होता. त्यामुळे, मृत्युपत्राचा लेख लिहुन ठेवण्यास तो सक्षम नव्हता. त्याच्या शारीरिक व मानसिक असमर्थतेचा व दुर्बलतेचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी लबाडीने व फसवणुक करुन मृत्युपत्राचा लेख तयार केला आहे. त्यामुळे, तथाकथित मृत्युपत्राचा लेख खोटा, खोडसाळ, अवैध, निरर्थक व बनावट आहे.

**६७.** याउलट, प्रतिवादींचे असे प्रतिपादन आहे की, मृत्युपत्राचा लेख कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांने तो शारीरिक व मानसिक दृष्टया सुदृढ असतांना निष्पादित करुन ठेवला आहे. कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यास वादीने हिन वागणुक देवून, त्यास मारहाण केली होती. त्याचप्रमाणे, कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील याची वादीने कधीही देखभाल, सेवासुश्रुषा किंवा सांभाळ केला नसल्याने, तो वादीवर नाराज होता. प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील याची सेवासुश्रुषा व सांभाळ केला. त्यामुळे, कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांने त्याची मिळकत नोंदणीकृत मृत्युपत्राने प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांना दिली आहे. कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील हे मृत्युपत्राचे निष्पादन करतांना सुदृढ, शारीरिक व मानसिक स्थितीमध्ये होते. वादीला

देखील सदरची बाब ज्ञात आहे. परंतु, केवळ मृत्युपत्रास विरोध करण्याकरीता कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील हा मृत्युपत्राच्या वेळी आजारी होता, शारीरिक व मानसिक दृष्टया दुर्बल होता, असे प्रतिपादन वादी करीत आहे.

**६८.** वादी व प्रतिवादींचे परस्पर विरोधी कथन आणि अनुषंगिक कायदेशीर तरतुदींचा विचार करता, मृत्युपत्राच्या निष्पादनाच्या वेळी मृत्युपत्रकर्ता, कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील, सुदृढ, चांगल्या व निर्णयक्षम मनःस्थितीत होता, ही बाब सिद्ध करण्याचे दायित्व मृत्युपत्राच्या लाभार्थ्यावर असते. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.०१ व ०२ हे मृत्युपत्राचे लाभार्थी आहेत. त्यामुळे, मृत्युपत्रकर्ता कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील हा मृत्युपत्राच्या निष्पादनाच्या वेळी सुदृढ, चांगल्या व निर्णयक्षम मनस्थीतीत (Sound and Disposing state of Mind) होता, असे सिद्ध करण्याचे दायित्व प्रतिवादींचे आहे.

**६९.** तदअनुषंगाने, प्रतिवादींची भिडस्त मृत्युपत्राचा साक्षीदार अशोक रघुनाथ पाटील (प्र.वा.सा.क्र.०२), **निशाणी क्र.९८,** याच्या साक्षीपुराव्यावर आहे. सदर साक्षीदाराच्या सरतपासामध्ये असे नमुद आहे की, दिनांक १६/०५/२००७ रोजी कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील सकळी त्याच्या घरी आले होते, असे नमुद केले आहे. कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील याची शारीरिक स्थिती चांगली होती, ते हिंडते फिरते होते, ठणठणीत होते, त्यांना सर्व काही व्यवस्थीत समजत होते, असे नमुद केले आहे. कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील हे दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये आले होते, असे देखील त्याच्या साक्षीपुराव्यात आले आहे. कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या सांगण्याप्रमाणेच टायपिस्ट, अनंत गायकर यांने मृत्युपत्राचा लेख तयार केला.

**७०.** सदर साक्षीदाराच्या उलटतपासामध्ये पटलावर असे आले आहे की, कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील हे सकाळी ७ ते ८ च्या सुमारास त्याच्या घरी आले होते. कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या घरापासुन त्याच्या घरापर्यंत ते पाई चालत आले होते. कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या घरापासुन त्याच्या घरापर्यंत पाई चालत गेल्यास दोन मिनींटाचे अंतर आहे. साक्षीदार अशोक रघुनाथ पाटील याच्या साक्षीपुराव्यात आलेल्या तथ्यांवरुन असे स्पष्ट होत आहे की, दिनांक १६/०५/२००७ रोजी कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील हे हिंडते

फिरते होते. सदर दिवशी साक्षीदार अशोक पाटील यास बोलावण्याकरीता, ते त्याच्या घरी गेले होते. त्याचप्रमाणे, दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये मृत्युपत्राचा लेख नोंदविण्याकरीता देखील ते उपस्थित होते. यावरुन, कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील हे हिंडते फिरते होते, असे सिद्ध होत आहे.

**७१.** कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील, याच्या आजारपणाबाबत, वादी व प्रतिवादी यांनी परस्पर विरोधी विधाने केली आहेत. परंतु, वादी किंवा प्रतिवादी यांनी कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील कोणत्या कालावधीमध्ये आणि कोणत्या आजाराने ग्रस्त होते, याबाबत काहीही स्पष्ट कथन केलेले नाही. त्याचप्रमाणे, त्यासंदर्भात, त्याच्या आजारपणाचा कोणताही ठोस पुष्टीकारक पुरावा पटलावर आलेला नाही.

**७२.** कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील, दरम्यानच्या काळात आजारी होते आणि त्यांचा औषोधोपचार प्रतिवादींनी केला, असे प्रतिवादीचे कथन आहे. परंतु, त्यावरुन असे अनुमान काढता येणार नाही की, दिनांक १६/०५/२००७ रोजी कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील हे आजारी होते. दिनांक १६/०५/२००७ रोजी कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील आजारी असल्याबाबतचे स्पष्ट कथन वादपत्रात आढळुन येत नाही. ते कोणत्या कालावधीमध्ये आजारी होते आणि त्यांना कोणता आजार झाला होता, याबाबत स्पष्ट कथन किंवा पुरावा पटलावर आलेला नाही. त्यामुळे, दिनांक १६/०५/२००७ रोजी कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील हे आजारी होते, असे अनुमान काढता येणार नाही.

**७३.** मृत्युपत्राच्या लेखास वैद्यकिय दाखला जोडलेला आहे. सदरचा दाखला डॉ. संदेश म्हात्रे यांनी दिलेला आहे. मृत्युपत्राचा लेख निष्पादित व नोंदणी करण्यापुर्वी सदरचा वैद्यकिय दाखला देण्यात आलेला आहे. परंतु, सदर वैद्यकिय दाखल्यामध्ये कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या शारीरिक व मानसिक स्थितीबाबत काहीही नमुद नाही. कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांचे वय ८० वर्ष असल्याचे सदर वैद्यकिय प्रमाणपत्रात नमुद आहे.

**७४.** मृत्युपत्राचा लेख दिनांक १६/०५/२००७ रोजी नोंदविण्यात आला. त्यानंतर, दिनांक २२/०१/२०१९ रोजी कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील यांचे निधन झाले. मृत्युपत्राच्या निष्पादनाची तारीख आणि

मृत्युपत्रकर्ता, कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील, याच्या मृत्युची तारीख विचारात घेता, असे स्पष्ट दिसुन येते की, मृत्युपत्राच्या निष्पादनाच्या तारखेपासुन जवळपास १२ वर्षांच्या नंतर मृत्युपत्रकर्ता कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील याचा मृत्यु झाला. मृत्युपत्र निष्पादित केल्यानंतर जवळपास १२ वर्ष कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील हयात होता. मृत्युपत्र निष्पादनाच्या वेळी किंवा त्यापुर्वी लगत कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील आजारी असल्याबाबतचा ठोस पुरावा पटलावर आलेला नाही.

**७५.** मृत्युपत्राचा साक्षीदारा अशोक पाटील याच्या पुराव्यात आलेल्या तथ्यांवरुन मृत्युपत्र निष्पादित करतांना व नोंदवितांना मृत्युपत्रकर्ता, कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील हा सुदृढ, चांगल्या व निर्णयक्षम मनस्थितीमध्ये होता, असे सिद्ध झाले आहे. मृत्युपत्राच्या निष्पादनाच्या व नोंदणीच्या वेळी मृत्युपत्रकर्ता, कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील, याची शारीरिक व मानसिक स्थिती ठासाळलेली होती, असे सिद्ध करणारा, कोणताही ठोस व पुष्टीकारक पुरावा पटलावर आलेला नाही. यासर्व, तथ्यांचा व परिस्थीतींचा विचार करता, कमळ्या उर्फ कमळाकर राघो पाटील, यांने सुदृढ, चांगल्या व निर्णयक्षम मनस्थितीत (Sound and disposing state of Mind) असतांना मृत्युपत्राचा लेख निष्पादित व नोंदणीकृत केला. या निष्कर्षाप्रत मी आलो आहे.

### सहदायकी मालमत्तेतील हिंतसंबंध मृत्युपत्राद्वारे प्रदान करण्याचा (Bequeath) कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांना अधिकार व क्षमता होती काय?

**७६.** वादीचे असे प्रपादन आहे की, सर्वंच वादमालमत्ता सहदायकी मालमत्ता असल्याने, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील, यांना सदर मालमत्तेसंबंधाने मृत्युपत्राचा लेख लिहुन ठेवण्याचा आणि त्याद्वारे सदर मालमत्ता प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांना प्रदान (Bequeath) करण्याचा कोणताही वैधानिक अधिकार व हक्क नव्हता. असे असतांना कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील, यांनी वादमालमत्तेपैकी, गट क्र.११६ व ४९६ या मिळकतीं संबंधाने मृत्युपत्राचा लेख तयार करुन प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांना सदर मालमत्ता प्रदान (Bequeath) केल्या आहेत. त्यामुळे, सदरचे मृत्युपत्र

गैरकायदेशीर, अवैध, अप्रभावी असे आहे. त्यामुळे, सदर मृत्युपत्राचा लेख वादीवर बंधनकारक नसुन तो रद्द होण्यास पात्र आहे.

**७७.** याउलट, प्रतिवादींचे असे कथन आहे की, वडीलोपार्जित मिळकतींच्या भाऊवाटपामध्ये वादमालमत्ता कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या मालकी व हिस्यास आलेल्या आहेत. त्यामुळे, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील हे वादमालमत्तांचे संपुर्ण मालक होते. त्यामुळे, वादमालमत्तेसंबंधाने मृत्युपत्राचा लेख लिहुन ठेवण्याचा आणि त्याद्वारे मालमत्ता प्रदान (Bequeath) करण्याचा कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांना पुर्ण हक्क व अधिकार होता. सबब, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांनी निष्पादित व नोंदणीकृत करुन ठेवलेला मृत्युपत्राचा लेख वैध व कायदेशीर आहे. त्याआधारे, गट क्र.११६ व ४९६ या मिळकतींचे प्रतिवादी क्र.०१ व ०२ हे संपुर्ण मालक व ताबेदार झाले आहेत.

**७८.** वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथनांच्या अनुषंगाने पटलावर उपलब्ध तथ्यांचे व पुराव्याचे बारकाईने वाचन व मुल्याकंन केले. त्यावरुन, असे स्पष्ट होत आहे की, वादमालमत्ता वडीलोपार्जित मालमत्ता आहेत. वडीलोपार्जित मालमत्तेचे विभाजन होऊन, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांना भाऊवाटपामध्ये वादमालमत्ता मिळालेल्या आहेत. वडीलोपार्जित (Ancestral) मालमत्तांचे कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील व त्याच्या भावांमध्ये वाटप होऊन वादमालमत्ता कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या स्वतंत्र हिस्से वाटयास आले आहेत. त्यामुळे, भावांसोबत झालेल्या वाटपानुसार वादमालमत्ता इतर नातेवाईकांच्या दृष्टीने कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या स्वतंत्र मालमत्ता आहेत. परंतु, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील आणि त्यांची मुले यांचे त्यावेळी एकत्र कुटूंब असल्यामुळे, कुटूंब प्रमुख म्हणुन कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यास वडीलोपार्जित मिळालेल्या मालमत्तां सहदायकी मालमत्ता ठरतात.

**७९.** कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील आणि त्यांची मुलं मुली यांच्याकरीता सदर मालमत्ता सहदायकी मालमत्ता ठरतात. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील आणि त्याची मुलं मुली हे संयुक्त कुटूंबाचे सहभाजक (Coparceners) असल्याकारणाने त्यासर्वांचा सहदायकी मालमत्तेमध्ये समसमान अविभक्त हिस्सा असल्याचे स्पष्ट होत आहे. वादी व प्रतिवादीं कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचे मुलं असल्याने त्यांचा सहदायकी

मालमत्तेमध्ये जन्मतः हिस्सा निर्माण होतो. वादमालमत्ता सहदायकी मालमत्ता असल्याने, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील आणि त्याच्या मुलां मुलींचा सदर सहदायकी मालमत्तेमध्ये समसमान हिस्सा असल्याने, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याला एकटयाला संपुर्ण वादमालमत्ता मृत्युपत्राद्वारे कोणत्याही एका सहदायकास हस्तांतरीत करण्याचा हक्क व अधिकार प्राप्त होत नाही. जरी असे असले तरी, हिंदु उत्तराधिकारी अधिनियमाच्या कलम ०६ मधील तरतुदींनुसार मिताक्षरा सहदायकी संपत्तीमध्ये कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याला देखील हिस्सा प्राप्त होतो.

८०. हिंदु उत्तराधिकारी अधिनियमाच्या कलम ३० मधील तरतुदींनुसार, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यास सहदायकी संपत्तीमधील त्याचे हितसंबंध अथवा हिस्सा मृत्युपत्राद्वारे प्रदान (bequeath) करण्याचा पुर्ण हक्क व अधिकार प्राप्त आहे. त्यासंदर्भांत, अधिक स्पष्टता होण्याकरीता हिंदु उत्तराधिकारी अधिनियमाच्या कलम ३० मधील तरतुद पुढीलप्रमाणे नमुद करण्यात येतेः–

**हिंदु उत्तराधिकारी अधिनियम कलम ३०.**

**कलम ३०ः– मृत्युपत्रीय उत्तराधिकारः–** कोणत्याही हिंदूला, त्यांने मृत्युपत्राद्वारे किंवा अन्य मृत्युपत्रीय व्यवस्थेद्वारे विल्हेवाट करण्याजोगी असेल अशा कोणत्याही संपत्तीची भारतीय उत्तराधिकारी अधिनियम १९२५ (१९२५ चा ३९) यांचे उपबंध किंवा त्या त्या काळी अंमलात असलेला व हिंदूना लागू असलेला अन्य कोणत्याही कायदा यांनुसार तशी विल्हेवाट करता येईल.

**स्पष्टीकरणः–** हिंदु पुरुषाचा मिताक्षरा सहदायकी संपत्तीतील हितसंबंध अथवा तरवड, तवज्ञे, इळ्ळम, कुटूंब किंवा कवर यांतील घटक व्यक्तींचा तरवड, तवज्ञे, इळ्ळम, कुटूंब किंवा कवर यांच्या संपत्तीतील हितसंबंध, या अधिनियमात किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, या (कलमाच्या) अर्थानुसार त्यांने किंवा तिने विल्हेवाट करण्याजोगी संपत्ती असल्याचे मानले जाईल.

८१. उपरोक्त कायदेशीर तरतुदी आणि प्रस्तुत दाव्यातील तथ्यें याचा एकत्रित विचार करता, असे दिसुन येते की, वादमालमत्ता ही कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांची सहदायकी मालमत्ता आहे. वादमालमत्तेमध्ये सहभाजक म्हणुन कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील

यांचा हिस्सा व हितसंबंध आहे. उपरोक्त उल्लेखित कलम ३० मधील तरतुदींनुसार, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यास सहभाजक म्हणुन वादमालमत्तेमध्ये असलेला त्याचा हिस्सा व हितसंबंध मृत्युपत्राद्वारे हस्तांतरीत करण्याचा संपुर्ण हक्क व अधिकार प्राप्त आहे. सदर अधिकारांने कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने निष्पादित व नोंदणीकृत केलेला मृत्युपत्राच्याआधारे सहदायकी मालमत्तेमध्ये त्यांचा हिस्सा व हितसंबंध हस्तांतरीत करण्याचा त्याला पुर्ण अधिकार असल्याने, त्याच्या स्वतःच्या हक्क व हितसंबंधांच्या हद्दीपर्यंत त्यांने दिनांक १६/०३/२००७ रोजी निष्पादित केलेला मृत्युपत्राचा लेख वैध व कायदेशीर असल्याचे स्पष्ट होत आहे.

८२. जरी, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांनी संपुर्ण गट क्र.११६ व ४९६ या मिळकतींसंबंधाने मृत्युपत्राचा लेख दिनांक १६/०३/२००७ रोजी निष्पादित व नोंदणीकृत केला असला, तरी त्याद्वारे संपुर्ण गट क्र.११६ व ४९६ प्रतिवादी क्र.०१ व ०२ याला हस्तांतरीत होणार नाही. परंतु, गट क्र.११६ व ४९६ मधील कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचा हिस्सा व हितसंबंध हस्तांतरीत करण्याचा त्यास वैध अधिकार असल्यामुळे, त्याचा हिस्याच्या हद्दीपर्यंत सदर मृत्युपत्राचा लेख वैध व कायदेशीर असल्याचे स्पष्ट होत आहे. गट क्र.११६ व ४९६ चे कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या हयातीमध्ये वाटप झाले असते, तर त्याला जो हिस्सा मिळाला असता, त्या हिस्याच्या हद्दीपर्यंत सदर गट क्र.११६ व ४९६ संबंधाने कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने करुन ठेवलेले दिनांक १६/०३/२००७ रोजीचे मृत्युपत्र वैध व कायदेशीर असल्याचे स्पष्ट होत आहे. यासर्व माझ्या समक्ष आलेल्या तथ्यांचा व परिस्थीतींचा विचार करता, दिनांक १६/०३/२००७ रोजीचा मृत्युपत्राचा लेख अवैध, निरर्थक किंवा अप्रभावी असल्याचे सिद्ध झाले नाही, या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. परिणामी, मुद्दा क्र.०२ चा निष्कर्ष याठिकाणी नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.०३ करीताः–**

८३. प्रस्तुतचा दावा वादमालमत्तेमध्ये वादीचा हिस्सा आहे, असे घोषित करुन सदरचा हिस्सा सरसनिरस मानाने तुटक व पृथक करुन वादीच्या ताबा कब्जा वहिवाटीत मिळण्याकरीता दाखल करण्यात आलेला

आहे. त्याचप्रमाणे, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या नावे असलेला दिनांक १६/०५/२००७ रोजीचा मृत्युपत्राचा लेख बेकायदेशीर, अवैध, निरर्थक व अप्रभावी असुन, वादीवर बंधनकारक नाही व तो रद्द करण्यात यावा, अशी देखील वादीची विनंती आहे. यापुढे, वादीची अशी विनंती आहे की, मृत्युपत्राच्या लेखाआधारे प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या नावे करण्यात आलेल्या महसुल नोंदींच्याआधारे त्यांनी गट क्र.११६ व ४९६ या मिळकतींचे स्वरुप बदलु नये, त्यात कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये, त्रयस्थ ईसमास सदर मिळकत हस्तांतरीत करु नये व कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध निर्माण करु नयेत, असा निरंतर ताकीदीचा हुकूम देण्यात यावा.

८४. सहदायकी मालमत्तेमधील हिस्सा तुटक व पृथक करुन स्वतंत्र ताब्यात मिळण्याचा दावा दाखल करण्यासाठीची मुदत सहदायकी मालमत्तेमधुन बेदखल करण्यात आल्याचे ज्ञात झाल्यापासुन १२ वर्षांच्या आत दाखल करावा लागतो.

८५. त्यासंदर्भात, मुदत अधिनियमाच्या अनुच्छेद (Article) ११० मध्ये अशी तरतुद घालुन देण्यात आली आहे की, संयुक्त कुटूंबाच्या मिळकतींमधील हिस्सा डावलण्यात आलेल्या व्यक्तीला त्याचा हिस्सा परत मिळविण्यासाठीचा दावा दाखल करण्याची मुदत १२ वर्षांची घालुन देण्यात आली आहे. ज्या वेळी त्याला संयुक्त कुटूंबाच्या मालमत्तेमधील त्याचा हिस्सा डावलण्यात आल्याचे ज्ञात होईल, तेव्हापासुन सदर मुदत सुरु होते.

८६. प्रस्तुत दाव्यामध्ये वादमालमत्तेमधील वादीचा हिस्सा प्रतिवादींनी मृत्युपत्राच्याआधारे वादमालमत्तेच्या महसुल अभिलेखात त्यांच्या नावे नोंदी करुन घेतल्यानंतर, प्रथमतः नाकारला आहे. प्रतिवादींच्या नावे महसुल अभिलेखामध्ये मृत्युपत्राच्याआधारे नोंद करण्याची कार्यवाही फेरफार क्र.४१३ अन्वये दिनांक ०६/०८/२०१९ रोजी केली. त्यामुळे, निश्चितच प्रतिवादींनी संयुक्त कुटूंबाच्या सहभाजकी मालमत्तेमधील वादीचा हिस्सा व अधिकार सन २०१९ साली प्रथमतः नाकारला असल्याचे स्पष्ट होत आहे. परिणामी, सहभाजकी मालमत्तेमधील वादीचा हिस्सा व हक्क प्रतिवादींनी प्रथमतः सन २०१९ साली नाकारला असल्याने, दावा दाखल करण्यास कारण सन २०१९ साली उद्भवले असल्याचे स्पष्ट होत आहे. सदर दाव्यास कारणेच्या तारखेपासुन प्रस्तुतचा दावा एका वर्षांच्या आत दाखल करण्यात

आला असल्याने, संयुक्त कुटूंबाच्या सहदायकी मालमत्तेमधील हिस्सा तुटक व पृथक करुन स्वतंत्र ताब्यात मिळण्यासाठी वादीने दाखल केलेला वाटपाचा दावा विहित मुदतीमध्ये असल्याचे स्पष्ट होत आहे.

८७. तथाकथित मृत्युपत्राचा लेख नोंदणी क्र.२४९८/२००७ दिनांक १६/०५/२००७ **(निशाणी क्र.७८)** बेकायदेशीर, अवैध, निरर्थक व अप्रभावी असल्याचे जाहिर करण्यात यावे, अशी वादीची विनंती आहे. मृत्युपत्रासंबंधाने घोषणेची दाद वादीने मागितलेली आहे. मुदत अधिनियमाच्या प्रकरण तीन व चार मध्ये जाहिर ठरावाची मागणी करणारा दिलासा आणि कोणताही लेख किंवा दस्त रद्द करण्याची मागणी करणारा दिलासा यासाठीची मुदत घालुन देण्यात आलेली आहे. सदर तरतुदींचा उल्लेख संदर्भांकरीता पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.

**मुदत अधिनियम, १९६३ः–**

**अनुच्छेद ५६ः–**

सदर तरतुदींनुसार जारी केलेल्या किंवा नोंदणीकृत दस्तऐवज बनावट (Forgery) असल्याचे घोषीत करुन मिळण्यासाठीची मुदत तीन वर्षांची आहे. ज्या दिवशी ज्या दस्तऐवजाचे जारीकरण किंवा नोंदणी झाल्याची बाब वादीला प्रथमतः ज्ञात होते, त्या दिवसापासुन दावा दाखल करण्यास मुदत सुरु होते.

**अनुच्छेद ५८ः–**

इतर कोणतीही घोषनात्मक दाद (Declaration) मिळविण्यासाठीची मुदत तीन वर्षांची आहे. ज्या दिवशी दावा दाखल करण्याचा हक्क प्रथम उत्पन्न होतो, त्या दिवसापासुन दावा दाखल करण्यास मुदत सुरु होते.

**अनुच्छेद क्र.५९ः–**

.कोणताही दस्तऐवज किंवा न्यायालयाचा हुकूमनामा रद्द (Cancel) किंवा निरस्त (Set aside) करुन घेण्यासाठी अथवा कराराचे प्रतिसंहरण (Rescission of Contract) करुन घेण्यासाठीची मुदत तीन वर्षांची आहे. दस्तऐवज किंवा हुकूमनामा रद्द किंवा निरस्त करुन घेण्याचा किंवा कराराचे प्रतिसंहरण करुन घेण्याचा अधिकार प्राप्त करुन देणारी तथ्ये वादीला प्रथमतः ज्ञात झाल्यापासुन दावा दाखल करण्याची मुदत सुरु होते.

८८. वादीच्या विद्वान विधिज्ञ श्रीमती. रेशमा पाटील, यांनी युक्तीवादामध्ये असे नमुद केले की, तथाकथित मृत्युपत्राच्या लेखाबाबत वादीला प्रथमतः महसुल अभिलेखात प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या नावे झालेल्या नोंदींच्याआधारे माहिती मिळाली. त्यापुर्वी, मृत्युपत्राच्या लेखाबाबत वादीला काहीही माहित नव्हते. त्यामुळे, मृत्युपत्रासंबंधाने जाहिर ठरावाचा दिलासा मिळविण्यासाठीचे कारण सन २०१९ साली प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी त्याच्या नावे महसुल अभिलेखात मृत्युपत्राच्या लेखाआधारे केलेल्या नोंदींमुळे निर्माण झाले. त्यामुळे, सदर तारखेपासुन प्रस्तुतचा दावा विहित मुदतीमध्ये दाखल करण्यात आलेला आहे. विधिज्ञा श्रीमती. रेशमा पाटील यांनी त्यांच्या युक्तीवादा पुष्टयर्थ पुढे नमुद केलेल्या न्यायनिर्णयाचा दाखला दिला आहे.

**शांतीस्वरुप मयत वारस व इतर**
**विरुध्द**
**ओंकार प्रसाद मयत वारस व इतर**
**द्वितीय अपिल क्र. ७५५/२०११**
**निकाल तारीखः २५/०४/२०२३**

मा. अल्हाबाद उच्च न्यायालयाने सदर प्रकरणामध्ये असे निरिक्षण नोंदविले आहे की, एखादया दस्तऐवजाच्या रद्दबातलतेसाठी दावा करण्याचा हक्क तेव्हाच पुर्णपणे निर्माण होतो, जेव्हा त्या दस्तऐवजांमुळे संबंधित पक्षाच्या ताबा किंवा मालकी हक्कावर प्रत्यक्ष परिणाम होतो. मृत्युपत्रातील लाभार्थी व्यक्तींला त्यातील मालमत्तेवरील हक्क केवळ मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युनंतर आणि त्या मृत्युपत्राच्या आधारेच सांगता येतो. त्यामुळे, मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युनंतरच लाभार्थी व्यक्तीं वादीच्या हक्कात हस्तक्षेप करु शकते किंवा करण्याची धमकी देऊ शकते. त्यामुळे, मुदत अधिनियमातील (Limitation Act) कलम ५९ (Article 59) हे मृत्युपत्राद्वारे केलेल्या संपतीच्या विनियोगास (Testamentary Disposition) लागु होत नाही. अशा प्रकरणामध्ये कलम ११३ (Article 113) लागु होते. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युपुर्वी वादीस मृत्युपत्राच्या निष्पादनाची माहिती होती किंवा नव्हती, हा मुद्दा मृत्युपत्र रद्द करण्यासाठीचा दावा कायदयाने निर्धारित मुदतीत दाखल करण्यात आला आहे की नाही, हे ठरविण्यासाठी महत्वाचा नाही. दावा दाखल

करण्याचा हक्क (Right to Sue) वादीच्या बाजुने मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युनंतरच निर्माण होतो. म्हणुनच, मृत्युपत्रासंबंधिच्या दाव्यामध्ये मुदत अधिनियमातील कलम ११३ लागु होते.

८९. याउलट, प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांचे विद्वान जेष्ठ विधिज्ञ श्री. व्ही.डी.कळके, यांनी युक्तीवादात असे नमुद केले की, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील हा त्याच्या हयातीमध्ये वादीमिळकतींचा संपुर्ण व स्वतंत्र मालक होता. सदरची बाब वादीने त्याच्या उलटतपासात मान्य व कबुल केलेली आहे. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या हयातीतच वादमालमत्तेचे विभाजन करण्यात आले. सदर विभाजनानुसार गट क्र.१२० ही मिळकत, त्यातील बेडे आणि बेडयामध्ये ठेवलेली रुपये दोन लक्ष किंमतीची सागाची झाडे वादीने त्याचा हिस्सा म्हणुन स्विकारलेली आहे. सदर वाटपाच्या वेळी गट क्र.११६ व ४९६ या मिळकतीं कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या हिस्यास देण्यात आल्या होत्या. सदर बाबी वादीला पुर्वीपासुनच ज्ञात असतांना, वादीने गट क्र.११६ व ४९६ या मिळकतींच्या वाटपाकरीता विहित मुदतीमध्ये दावा दाखल केलेला नाही. त्याचप्रमाणे, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने गट क्र.११६ व ४९६ या मिळकतीं नोंदणीकृत मृत्युपत्राने प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांना प्रदान (bequeath) केल्याचे वादीला पुर्वीपासुन ज्ञात असतांना, तथाकथित मृत्युपत्राच्या लेखास विहित मुदतीमध्ये वादीने आव्हानित केलेले नाही. मृत्युपत्राचा लेख नोंदणीकृत असल्यामुळे, सदर दस्ताच्या नोंदणीच्या तारखेपासुन तीन वर्षांच्या आत दावा दाखल करणे बंधनकारक होते. परंतु, वादीने विहित मुदतीमध्ये मृत्युपत्रास आव्हानित करणारा दावा दाखल केलेला नाही. त्यामुळे, सन २००७ रोजीच्या नोंदणीकृत मृत्युपत्राच्या अनुषंगाने १३ वर्षांनंतर दाखल केलेला प्रस्तुतचा दावा मुदत बाह्य झालेला आहे. परिणामी, प्रस्तुतचा दावा मुदत बाह्य असल्याने तो फेटाळण्यात यावा, अशी विद्वान जेष्ठ विधिज्ञ श्री. व्ही.डी.कळके यांची विनंती आहे.

९०. वादी व प्रतिवादींच्या विधिज्ञांनी सादर केलेल्या युक्तीवादाच्या अनुषंगाने, पटलावर उपलब्ध तथ्यांचे, उपरोक्त कायदेशीर तरतुदींच्या प्रकाशात मुल्यांकन करण्यात आले. पटलावर आलेल्या तथ्यें व पुराव्यांवरुन असे स्पष्ट होत आहे की, मृत्युपत्राच्या लेखाबाबत वादीला सन २०१९ साली

प्रथमतः माहिती झाली. मृत्युपत्राचा लेख हा मृत्युपत्रकर्ता याच्या मृत्युनंतर अंमलात येत असल्याने, त्याच्या मृत्युपुर्वी सदर मृत्युपत्रासंबंधीत इतरांना माहिती असण्याचे कारण नाही. प्रस्तुत दाव्यामध्ये, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने लिहुन व नोंदवून ठेवलेल्या मृत्युपत्राच्या लेखाबाबत, मृत्युपत्रकर्ता हयात असतांनाचा, वादीला मृत्युपत्राबाबत ज्ञात होते, असे सिद्ध करणारा पुरावा पटलावर आलेला नाही. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या मृत्युनंतर प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी मृत्युपत्राच्याआधारे गट क्र.११६ व ४९६ या मिळकतींच्या महसुल अभिलेखामध्ये त्यांच्या नावाची नोंद फेरफार क्र.४१३ अन्वये करुन घेतली असल्याचे पटलावर आले आहे. त्यामुळे, निश्चितच सदर नोंद झाल्यानंतर, वादीला मृत्युपत्राच्या लेखाबाबत माहिती मिळाली असल्याचे दिसुन येते.

**९१.** उपरोक्त उल्लेखित शांतीस्वरुप या प्रकरणामध्ये मा. अल्हाबाद उच्च न्यायालयाने नोंदविलेले निरिक्षण प्रस्तुत दाव्यास लागु पडते. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.०१ व ०२ हे तथाकथित मृत्युपत्राचे लाभार्थी आहेत. मृत्युपत्रकर्ता कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या मृत्युनंतरच लाभार्थी व्यक्तींना म्हणजेच प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांना मालमत्तेसंबंधाने हक्क प्राप्त होतो. त्यानंतरच, मृत्युपत्राचे लाभार्थी व्यक्तीं वादीच्या हक्कात हस्तक्षेप करु शकतात किंवा हस्तक्षेपाची धमकी देवू शकतात. वादीचे असे स्पष्ट कथन आहे की, मृत्युपत्राच्या लेखाआधारे प्रतिवादींनी वादमालमत्तेमधील वादीचा हिस्सा नाकारला आहे. त्यामुळे, दावा दाखल करण्याचा हक्क वादीला मृत्युपत्राच्याआधारे प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी वादमालमत्तेच्या महसुल अभिलेखात त्यांच्या नोंदी करुन घेतल्यानंतर, वादीचा हिस्सा व हक्क डावलल्यानंतर निर्माण होतो. वादीच्या हक्काला व हिस्याला प्रथमतः प्रत्यक्ष धोका प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी मृत्युपत्राच्याआधारे त्यांच्या नावाची नोंद वादमालमत्तेच्या महसुल अभिलेखामध्ये केल्यानंतर निर्माण झाला.

**९२.** मुदत अधिनियम १९६३, मध्ये मृत्युपत्राच्या अनुषंगाने दिलासा मिळविण्याकरीता कोणतीही विशिष्ट तरतुद घालुन देण्यात आलेली नाही. मुदत अधिनियम १९६३ च्या कलम ११३ मध्ये असे नमुद आहे की, असा कोणताही दावा ज्याकरीता या अधिनियमांतर्गत अन्यत्र कोठेही कोणतीही विशिष्ट तरतुद घालुन देण्यात आलेली नसेल, तर दावा दाखल

करण्याची मुदत तीन वर्षे घालुन देण्यात आलेली आहे. ज्यावेळी, दावा दाखल करण्याचा हक्क प्रथमतः निर्माण होतो, त्यावेळेपासुन सदर दाव्याच्या मुदतीचा आरंभ होतो.

१३. प्रस्तुत दाव्यामध्ये, प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी महसुल अभिलेखामध्ये मृत्युपत्राच्याआधारे सन २०१९ साली नोंदी करुन घेतल्यानंतर, वादमालमत्तेमधील वादीचा हिस्सा व अधिकार नाकारला आहे. त्यामुळे, दावा दाखल करण्याचा हक्क, वादीचा हिस्सा व अधिकार प्रतिवादींनी नाकारल्यापासुन निर्माण/ उद्भवला असल्याचे स्पष्ट होत आहे.प्रस्तुतचा दावा सन २०२० साली दाखल करण्यात आलेला आहे. त्यावरुन, असे स्पष्ट होत आहे की, प्रस्तुतचा दावा दाखल करण्याचा हक्क निर्माण झाल्यापासुन विहित मुदतीमध्ये दाखल करण्यात आलेला आहे. परिणामी, प्रस्तुतचा दावा मुदतीमध्ये दाखल करण्यात आलेला असल्याने मुद्दा क्र.०३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येतो.

**मुद्दा क्र.०४ करीताः–**

१४. प्रतिवादींनी असा आक्षेप नोंदविला आहे की, प्रस्तुत दाव्यास आवश्यक पक्षकारांची उणिव या तत्वाची बांधा निर्माण होते. प्रतिवादीचे विद्वान विधिज्ञ यांनी युक्तीवादात असे नमुद केले की, वादमालमत्तेपैकी, गट क्र.९४ ही मिळकत वादी, प्रतिवादी व त्यांच्या चुलत बहिणींची सामाईक मिळकत आहे. त्यामुळे, चुलत बहिणींना प्रस्तुत दाव्यामध्ये पक्षकार करणे आवश्यक होते. धाकली नागु म्हात्रे, तुळसाबाई कमळाकर पाटील आणि गंगुबाई महादेव माळी या वादी व प्रतिवादींच्या चुलत बहिणी आहेत. त्यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकरा म्हणुन जोडण्यात आलेले नाही. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांचे भाऊ आणि त्यांचे वारस हे देखील प्रस्तुत दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. परंतु, त्यांना प्रस्तुत दाव्यामध्ये पक्षकार म्हणुन जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे, प्रस्तुत दाव्यास आवश्यक पक्षकारांची उणिव या तत्वाची बांधा निर्माण होते. त्यामुळे, दावा त्रुटीपुर्ण असल्याने फेटाळण्यात यावा, अशी विधिज्ञ श्री. व्ही.डी.कळके यांची विनंती आहे. सदर युक्तीवादाच्या पृष्टयर्थ विधिज्ञ श्री. कळके यांनी पुढे नमुद केलेल्या न्यायनिर्णयाचा दाखला दिला आहे.

०१. AIR 2004 SUPREME COURT 5088
**श्रीमती. सविता गर्ग विरुध्द संचालक, राष्ट्रीय हृदय संस्था**

०२. 1992 SCR (2) 1.
**रमेश कुंदनमल वि. मुन्सिपल कॉपोरेशन ग्रेटर बॉम्बे.**

मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर प्रकरणामध्ये आवश्यक पक्षकार आणि योग्य पक्षकार याबाबत विश्लेषणात्मक निरिक्षण नोंदविलेले आहे. 'आवश्यक पक्षकार' म्हणजे ज्याच्या गैरहजेरीमध्ये कोणताही परिणामकारक आदेश पारित केला जावू शकत नाही. 'योग्य पक्षकार' म्हणजे ज्याच्या गैरहजेरीमध्ये परिणामकारक आदेश पारित केला जावू शकतो, परंतु, ज्याची उपस्थीती पुर्ण व अंतिम निर्णयाकरीता आवश्यक असते.

०३. 2011 ALL SCR 162
**जगटु विरुध्द सुरज मल व इतर**

मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर प्रकरणामध्ये असे निरिक्षण नोंदविले आहे की, जर मालकी हक्क घोषणेचा दिलासा दाव्याद्वारे मागितलेला असेल, तर तशा दाव्यामध्ये ज्याच्या विरुध्द मालकी हक्क प्रपादन केला आहे, तो व्यक्ती दाव्यात पक्षकार असणे आवश्यक आहे.

**९५.** याउलट, वादीच्या विद्वान विधिज्ञां श्रीमती. रेशमा पाटील, यांनी असा युक्तीवाद सादर केला की, प्रस्तुतचा दावा वाटपासंबंधी आणि मृत्युपत्राच्या संबंधाने दाखल करण्यात आलेला आहे. तदअनुषंगाने, सर्व सहहिस्सेदारांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे, तथाकथित मृत्युपत्राच्या लाभार्थ्यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार म्हणुन जोडण्यात आलेले आहे. आवश्यक त्या सर्व व्यक्तींना प्रस्तुत दाव्यात पक्षकार करण्यात आलेले आहे. प्रस्तुतचा दावा कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या सहभाजकी मिळकतींसंबंधाने, त्यांच्या वारसांमध्ये आपसात असल्याने, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या भावांना किंवा बहिणींना किंवा त्यांच्या वारसांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार म्हणुन जोडण्याची कोणतीही आवश्यकता नाही. ते प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार नाहीत. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या वारसांना प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणुन समाविष्ट करण्यात आलेले आहे. त्यामुळे, प्रस्तुत

दाव्यास आवश्यक पक्षकारांची उणिव या तत्वाची कोणतीही बांधा निर्माण होत नाही.

९६. वादी व प्रतिवादींच्या विधिज्ञांनी सादर केलेल्या युक्तीवादाच्या अनुषंगाने उपरोक्त नमुद मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निरिक्षणाच्या प्रकाशझोतात प्रस्तुत दाव्यातील तथ्यांचे अवलोकन केले असता, असे स्पष्ट होत आहे की, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांच्या वडीलोपार्जित मिळकतींच्यासंबंधाने प्रस्तुतचा दावा वाटपासाठी आणि कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने लिहुन व नोंदवून ठेवलेल्या मृत्युपत्राच्या अनुषंगाने आहे.

९७. राघो गणु पाटील याला गोविंद, नारायण व कमळया उर्फ कमळाकर असे तीन पुत्र होते. राघो गणु पाटील यांच्या मृत्युनंतर, त्याच्या सर्व स्थावर व जंगम संपत्तीचे त्याच्या मुलांमध्ये म्हणजे गोविंद, नारायण व कमळया उर्फ कमळाकर यांच्यामध्ये पुर्वीच वाटप झाले असल्याचे वादी व प्रतिवादी यांनी मान्य व कबुल केलेले आहे. सदर वाटपाच्यासंबंधाने फेरफार क्र.८८२ व १२३८ नोंदविण्यात आल्याचे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे. राघो गणु पाटील, यांच्या वडीलोपार्जित मिळकतींचे त्याच्या मुलांमध्ये वाटप होवून वादमालमत्ता कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या हिस्यास आली असल्याचे वादी व प्रतिवादींना कबुल आहे.

९८. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याला वडीलोपार्जित मिळकतींच्या भावासोबत झालेल्या वाटपामध्ये दावामिळकतीं हिस्यास मिळालेल्या आहेत, असे पटलावर उपलब्ध पुराव्यावरुन सिद्ध झाले आहे. सदर सहदायकी मिळकतींसंबंधाने वादीने प्रस्तुतचा दावा त्याचा हिस्सा घोषित करुन मिळण्याकरीता आणि तुटक व पृथक करुन स्वतंत्र ताबा व वहिवाटीत मिळण्याकरीता दाखल केला आहे. त्यामुळे, प्रस्तुत दाव्यामध्ये कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचे सर्व वारस आवश्यक व योग्य पक्षकार आहेत. वादीने प्रस्तुत दाव्यात कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचे सर्व वारसांना पक्षकार केले असल्याचे दिसुन येत आहे.

९९. त्याचप्रमाणे, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने निष्पादित व नोंदणीकृत केलेल्या मृत्युपत्राच्या लेखाच्या अनुषंगाने घोषणेचा दिलासा वादीने मागितलेला आहे. त्याकरीता, मृत्युपत्राचे लाभार्थ्यांना वादीने प्रस्तुत दाव्यात पक्षकार म्हणुन जोडलेले आहे. तथाकथित मृत्युपत्राचा लेख

प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या लाभात करण्यात आलेला आहे. ते मृत्युपत्राचे लाभार्थी असल्याने त्यांना पक्षकार म्हणुन जोडण्यात आलेले आहे.

**१००.** उपरोक्त सर्व तथ्यांचा व परिस्थीतींचा विचार करता, असे स्पष्ट होत आहे की, प्रस्तुत दाव्यामध्ये वादीने आवश्यक त्या सर्व व्यक्तींना पक्षकार म्हणुन जोडलेले आहे. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचे भाऊ, बहिण किंवा त्यांचे वारस प्रस्तुत दाव्यात आवश्यक किंवा योग्य पक्षकार नाहीत. त्यामुळे, त्यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार म्हणुन जोडले नसल्याने, प्रस्तुत दाव्यास आवश्यक पक्षकरांची उणिव या तत्वाची बांधा निर्माण होत नाही. सबब, मुद्दा क्र.०४ चा निष्कर्ष मी त्याप्रमाणे, नकारार्थी नोंदवित आहे.

## <u>मुद्दा क्र.०५ ते ०७ करीताः–</u>

**१०१.** प्रस्तुत दाव्यातील वादमालमत्ता वादी व प्रतिवादीं यांच्या कुटूंबाची वडीलोपार्जित मालमत्ता असल्याचे पटलावर आलेल्या पुराव्यावरुन सिद्ध झाले आहे. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याला कौंटुंबिक वाटपामध्ये वादमालमत्ता त्याच्या भावांसोबत झालेल्या वाटपात हिस्यास आलेली आहे. त्यामुळे, सदर मालमत्ता ही कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील आणि त्याच्या मुलां मुलींची सहदायकी मिळकत असल्याचे सिद्ध होत आहे. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचा आणि त्याच्या मुलां मुलींचा वादमालमत्तेमध्ये सहदायक म्हणुन समसमान अविभक्त हिस्सा असल्याचे सिद्ध झाले आहे. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या हयातीत किंवा त्याच्या मृत्युनंतर त्याच्या मुलां मुलींमध्ये वादमालमत्तेचे आजपर्यंत वाटप झाले नसल्याचे सिद्ध झाले आहे. आजही वादमालमत्ता सहदायकी मिळकत असल्यामुळे, त्यात सर्वांचाच समसमान अविभक्त हिस्सा असल्याचे सिद्ध झाले आहे.

**१०२.** कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने त्याच्या हयातीत नोंदणीकृत मृत्युपत्राचा लेख निष्पादित व नोंदणीकृत करुन ठेवल्याचे सिद्ध झाले आहे. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने गट क्र.११६ व ४९६ या दोन्ही मिळकतीं पुर्णपणे प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांना मृत्युपत्राने प्रदान (Bequeath) केल्या असल्याचे दिसुन येते. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील हा संपुर्ण गट क्र.११६ व ४९६ या मिळकतींचा स्वतंत्र व संपुर्ण एकटा मालक नसल्यामुळे, गट क्र.११६ व ४९६ या जमिनींचे संपुर्ण क्षेत्र मृत्युपत्राने

प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांना प्रदान करण्याचा हक्क किंवा अधिकार त्याला प्राप्त होत नाही. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचा सहदायकी मिळकतींमध्ये गट क्र.११६ व ४९६ मध्ये असलेला हिस्सा तो मृत्युपत्राद्वारे प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांना हस्तांतरीत करु शकतो.

**१०३. हिंदू उत्तराधिकारी अधिनियमाच्या कलम ३०** मधील तरतुदींनुसार कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या लाभात गट क्र.११६ व ४९६ या मिळकतींचे करुन दिलेले मृत्युपत्र केवळ त्याच्या हिस्यास येणा–या क्षेत्रफळापुर्ते लागु व बंधनकारक आहे. त्यामुळे, गट क्र.११६ व ४९६ या मिळकतीमधील कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या हिस्यास येणारे क्षेत्रफळ प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांना मृत्युपत्राद्वारे प्राप्त होते. परंतु, गट क्र.११६ व ४९६ चे संपुर्ण क्षेत्र प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांना मृत्युपत्राआधारे माहिती व ताबेवहिवाटीस ठेवता येणार नाही.

**१०४.** उपरोक्त सर्व तथ्यांचा व परिस्थीतींचा विचार करता, वादमालमत्ता सहदायकी मालमत्ता असल्याने कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचा, वादीचा व प्रतिवादींचा सदर मालमत्तेमध्ये अविभक्त समसमान हिस्सा असल्याच्या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचा स्वतःचा, त्याच्या चार मुलांचा आणि तीन मुलींचा वादमालमत्तेमध्ये समसमान अविभक्त हिस्सा असल्याचे सिद्ध झाले आहे. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने गट क्र.११६ व ४९६ या मिळकतींसंबंधाने मृत्युपत्राचा लेख प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या लाभात लिहुन दिलेला आहे. त्यामुळे, गट क्र.११६ व ४९६ मधील कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचा १/८ हिस्सा प्रतिवादी क्र.०१ व ०२ मिळविण्यास पात्र आहेत. परंतु, इतर वादमालमत्ता गट क्र.७५, ८१, १२० व ९४ आणि ग्रामपंचायत घर क्र.१७५ या मिळकतींसंबंधाने कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने मृत्युपत्राद्वारे हस्तांतरण केलेले नाही. त्यामुळे, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या मृत्युनंतर सदर मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादी यांचा प्रत्येकी १/७ अविभक्त हिस्सा निर्माण होतो, या निष्कर्षाप्रत मी आलो आहे.

**१०५.** कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने नोंदणीकृत मृत्युपत्र **निशाणी क्र.७८** अन्वये गट क्र.११६ व ४९६ मधील त्याचा हिस्सा प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या लाभात सोडलेला असल्याने, वाटपाच्या वेळी कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचा सदर मालमत्तेतील हिस्सा स्वतंत्र करुन मृत्युपत्राच्या लेखाआधारे तो प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांना देणे क्रमप्राप्त असल्याचे स्पष्ट होत आहे.

**१०६.** प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांची नावे मृत्युपत्राच्या लेखाआधारे गट क्र.११६ व ४९६ च्या महसुल अभिलेखामध्ये नोंदविण्यात आलेली आहेत. त्यामुळे, सदर नोंदींच्याआधारे प्रतिवादी क्र.०१ व ०२ सदर गट क्र.११६ व ४९६ त्रयस्थ व्यक्तींना हस्तांतरीत करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, वाटप होऊन ज्याचा त्याचा हिस्सा ज्याच्या त्याच्या स्वतंत्र ताब्यात मिळेपर्यंत सर्वंच वादमालमत्तेचे हस्तांतरण प्रतिबंधीत करणे आवश्यक आहे. त्याकरीता, मालमत्ता हस्तांतरीत करु नये किंवा त्यावर त्रयस्थ व्यक्तींचे हितसंबंध निर्माण करु नयेत, असा निरंतरची ताकीद मंजुर करणे न्यायोचित वाटते. यासर्व कारणमिमांसेचा आणि तथ्यांचा विचार करता, मुद्दा क्र.०५ ते ०७ चा निष्कर्ष मी त्याप्रमाणे अशंतः होकारार्थी नोंदवित आहे.

## <u>मुद्दा क्र.०८ करीताः–</u>

**१०७.** प्रतिवादींनी वादीकडुन नुकसान भरपाई स्वरुपातील खर्च (Compensatory costs) मागितलेली आहे. प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादीने खोटा दावा दाखल करुन त्यांना नाहक खर्चास सामोरे जाण्यास भाग पाडले. परंतु, पटलावर आलेल्या तथ्यांवरुन असे स्पष्ट झाले आहे की, वादीचा दावा योग्य होता. उलटपक्षी, प्रतिवादींनी वादीचा हिस्सा व अधिकार नाकारुन वादीला दावा दाखल करण्यास भाग पाडले असल्याचे स्पष्ट होत आहे. सबब, प्रतिवादींनी मागणी केल्याप्रमाणे नुकसान भरपाई मिळविण्यास ते पात्र नाहीत, असे स्पष्ट होत आहे. परिणामी, मुद्दा क्र.०८ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतो.

## <u>मुद्दा क्र.०९ करीताः–</u>

**१०८.** कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने गट क्र.११६ व ४९६ या मिळकतींसंबंधाने मृत्युपत्राचा लेख प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या लाभात लिहुन दिलेला आहे. कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचा गट

क्र.११६ व ४९६ मधील १/८ हिस्सा त्यांने नोंदणीकृत मृत्युपत्राच्या लेखाने प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांना प्रदान (bequeath) केला असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे, गट क्र.११६ व ४९६ मधील कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचा १/८ हिस्सा प्रतिवादी क्र.०१ व ०२ मिळविण्यास पात्र आहेत. परंतु, इतर वादमालमत्ता गट क्र.७५, ८१, १२० व ९४ आणि ग्रामपंचायत घर क्र.१७५ या मिळकतींसंबंधाने कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने मृत्युपत्राद्वारे हस्तांतरण केलेले नाही. त्यामुळे, कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याच्या मृत्युनंतर सदर मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादी यांचा प्रत्येकी १/७ अविभक्त हिस्सा निर्माण होतो. त्याप्रमाणे, वादी गट क्र.११६ व ४९६ मध्ये १/८ हिस्सा आणि वादमालमत्ता गट क्र.७५, ८१, १२० व ९४ आणि ग्रामपंचायत घर क्र.१७५ या मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादी १/७ हिस्सा मिळविण्यास पात्र आहेत, या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. त्याचप्रमाणे, मृत्युपत्राचा लेख मुलतः निरर्थक, अवैध, गैरकायदेशीर, अप्रभावी असल्याचे सिद्ध झाले नाही. त्यामुळे, मृत्युपत्राच्या अनुषंगाने वादीने मागितलेला अनुतोष मिळविण्यास वादी पात्र नाही, या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. परिणामी, मुद्दा क्र.०९ चा निष्कर्षाप्रत खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

**०१.** दावा खालीलप्रमाणे खर्चासह अंशतः मंजुर करण्यात येतो.

**०२.** मौजे तळवली तर्फे उमटे ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट क्र.७५, ८१, १२० व ९४ आणि ग्रामपंचायत घर क्र.१७५ या मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादींचा प्रत्येकी १/७ अविभक्त हिस्सा आहे, असे घोषित करण्यात येते.

**०३** मौजे तळवली तर्फे उमटे ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट क्र.११६ व ४९६ या मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादींचा प्रत्येकी १/८ अविभक्त हिस्सा आहे, असे घोषित करण्यात येते.

| | |
|---|---|
| ०४. | मौजे तळवली तर्फे उमटे येथील गट क्र.११६ व ४९६ मध्ये कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील याचा असलेला १/८ हिस्सा तुटक व पृथक करुन मृत्युपत्राच्या लेखाआधारे प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांच्या प्रत्यक्ष, स्वतंत्र ताबा व कब्जेवहिवाटीत देण्यात यावा. |
| ०५. | वादी व प्रतिवादींचा वादमालमत्तेमध्ये असलेला अविभक्त हिस्सा तुटक व पृथक करुन त्यांच्या स्वतंत्र ताब्यात देण्यात यावा. |
| ०६. | प्रत्यक्ष वाटप होवून वादमालमत्तेपैकी, प्रत्येक हिस्सेदाराचा हिस्सा तुटक व पृथक करुन त्याच्या स्वतंत्र ताब्यात मिळेपर्यंत वादी किंवा प्रतिवादी यांनी वादमालमत्तेचे हस्तांतरण करु नये तसेच त्रयस्थ व्यक्तींचे हितसंबंध त्यात निर्माण करु नये, असा निरंतर मनाई हुकूम पारित करण्यात येतो. |
| ०७. | कमळया उर्फ कमळाकर राघो पाटील यांने निष्पादित व नोंदणीकृत केलेल्या मृत्युपत्र नोंदणी क्र.२४९८/२००७ दिनांक १६/०५/२००७ च्या अनुषंगाने वादीने मागितलेला दिलासा फेटाळण्यात येतो. |
| ०८. | वादमालमत्तेपैकी, शेतसा-यास पात्र असलेल्या मिळकतींचे वाटप करण्याकरीता हुकूमनाम्याची एक प्रत दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ५४ अन्वये जिल्हाधिकारी, अलिबाग, यांच्याकडे प्रत्यक्ष वाटप व विभाजन करुन हिस्सेदारांच्या स्वतंत्र ताब्यात देण्याकरीता पाठविण्यात यावी. |
| ०९. | वादमालमत्तेपैकी मौजे तळवली तर्फे उमटे ग्रामपंचायत घर क्र.१७५, यामिळकतीचे प्रत्यक्ष विभाजन व वाटप करुन वादी व प्रतिवादीं यांचा हिस्सा तुटक व पृथक करुन त्यांच्या प्रत्यक्ष स्वतंत्र ताब्यात देण्याकरीता उपअधिक्षक भुमी अभिलेख, अलिबाग, यांची न्यायालयीन आयुक्त |

म्हणुन नेमणुक करण्यात येते.

१०. प्राप्त परिस्थीतीमध्ये वादी आणि प्रतिवादीं यांनी आपापला खर्च सोसावा.

११. न्यायनिर्णयाप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

१२. न्यायानिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत व पारित करण्यात आला.

SAKHARAM NARAYANRAO NAIK

Digitally signed by SAKHARAM NARAYANRAO NAIK
Date: 2026.07.14 15:22:59 +0530

ठिकाणः– अलिबाग (स.ना.नाईक)
दिनांकः– १४/०७/२०२६ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
अलिबाग, जिल्हा रायगड.